मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २०९ ■ गुरुवार, ०९ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# ट्रम्प यांच्याकडून १४ दिवसांचा युद्धविराम घोषित

## इराणनं म्हटलं, 'आमचा ऐतिहासिक विजय'

**वॉशिंग्टन-** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील बॉम्बहल्ला आणि आक्रमणाची मोहीम स्थगित करून दोन आठवड्यांच्या युद्धविरामाला सहमती दर्शवली आहे. हा निर्णय म्हणजे ऐतिहासिक विजय असल्याचं इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेनं म्हटलं आहे. 'प्रेस टीव्ही'च्या वृत्तानुसार सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेनं युद्धासंदर्भातील इराणची जवळपास सर्व उद्दिष्टे साध्य झाल्याचं म्हटलं आहे.

इराणच्या सरकारी माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेनं म्हटलं आहे की, गुन्हेगार अमेरिकेला आमची 10-कलमी योजना स्वीकारण्यास भाग पाडलं आहे. इराणनं ऐतिहासिक विजय मिळवला आहे. अमेरिकेनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील इराणचे नियंत्रण आणि युरेनियम संवर्धनाचे अधिकार मान्य केले आहेत. तसेच सर्व निर्बंध हटवणं मान्य केलं आहे. अमेरिकेनं आक्रमण थांबवणे, नुकसानीची भरपाई देणे आणि या प्रदेशातून आपले सैन्य मागं घेणं मान्य केलं आहे.



चाळीसाव्या दिवसापर्यंत युद्ध सुरू- अमेरिकेनं एका महिन्याहून अधिक काळ युद्धविरामासाठी दबाव आणला होता. परंतु इराणनं आपल्या उद्दिष्टांना प्राधान्य देत दिलेल्या मुदती वारंवार नाकारल्या होत्या. जोपर्यंत उद्दिष्टे साध्य होत नाहीत, तोपर्यंत युद्ध सुरुच राहील, असे सुरुवातीलाच ठरविलं होतं. शत्रुला पश्चात्ताप आणि हतबलता तसेच देशावरील दीर्घकालीन धोका दूर करणे, अशी उद्दिष्टे इराणनं साध्य केली आहे. त्यामुळे हे युद्ध आज चाळीसाव्या दिवसापर्यंत सुरू राहिले. शत्रुनं दिलेल्या कोणत्याही प्रकारच्या मुदतीला आपण महत्त्व दिलं नाही, असे इराणी सरकारी माध्यमांनुसार परिषदेनं म्हटलं आहे.

ट्रम्प यांनी काय म्हटलं?- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचा 10-कलमी प्रस्ताव व्यवहार्य असल्याचं म्हटल्यानंतर युद्धविरामाला गती मिळाली. ट्रम्प यांनी ट्रूथ सोशलमधील पोस्टमध्ये म्हटलं की, इराणचा 10 कलमी प्रस्ताव एका कायमस्वरूपी करारासाठी वाटाघाटींचा आधार ठरेल. तसेच, अमेरिकेनं आपली बहुतांश लष्करी उद्दिष्टे साध्य केली आहेत. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ आणि फील्ड मार्शल आसिम मुनीर यांच्याशी झालेल्या संभाषणानंतर त्यांनी मला आज रात्री इराणच्या दिशेने पाठवली जाणारी विनाशकारी लष्करी तुकडी रोखून धरण्याची विनंती केली होती. इराणं हॉर्मुझची सामुद्रधुनी (Strait of Hormuz) पूर्णपणे, तात्काळ आणि सुरक्षितपणे खुली करण्यास सहमती दर्शवावी, ही अट आहे. मी इराणवरील बॉम्बवर्षाव आणि हल्ले दोन आठवड्यांच्या कालावधीसाठी स्थगित करण्यास संमती देत आहे. हा दोन्ही बाजुंनी युद्धविराम असेल!

इराणकडून पाकिस्तानचे कौतुक- इराणनं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा शांततेचा प्रस्ताव स्वीकारला आहे. 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' (Strait of Hormuz) मार्ग दोन आठवड्यांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी तसेच लष्करी कारवायांना विराम देण्यास सहमती दिली आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी एक्स मीडियावर म्हटलं की, जर इराणवर कोणताही हल्ला झाला नाही, तर इराण आपल्या लष्करी कारवाया थांबवेल. इराणच्या वतीनं, या प्रदेशातील युद्ध संपुष्टात आणण्यासाठी अथक प्रयत्न केल्याबद्दल, मी माझे प्रिय बंधू—पाकिस्तानचे पंतप्रधान महामहीम शरीफ आणि फील्ड मार्शल मुनीर यांच्याप्रती कृतज्ञता आणि कौतुक व्यक्त करतो.

युद्धाचा गॅस सिलिंडर पुरवठा आणि अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम- गेली सुमारे 40 दिवस इराणवर अमेरिका आणि इस्रायल संयुक्तपणे हल्ला करत असल्यानं मध्यपूर्वेत अशांतता निर्माण झाली आहे. जगभरातील एकूण 20 टक्के कच्च्या तेलाचा वाहतूक होत असलेल्या इराणच्या नियंत्रणातील सामुद्रधुनीमधून होणाऱ्या जहाजांच्या वाहतुकीत अडथळा निर्माण झाल्याचं दिसून आला. त्याचा फटका म्हणून जगभरात कच्च्या तेलाचा दर प्रति बॅरल 100 डॉलरहून अधिक झाले आहेत. दुसरीकडं नैसर्गिक वायुचा तुटवडा निर्माण झाल्यानं भारतात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर मर्याद आल्यानं हॉटेलसह विविध उद्योगांवर परिणाम झाला. मध्यपूर्वेतील युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम दिसत असल्यानं गुंतवणुकदारांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. त्यामुळे युद्धविरामानंतर अनेकांनी सुटकेचा उसासा टाकला आहे.

# पत्रकार हरेश साठे यांचा रायगड जिल्हा श्रमिक पत्रकारिता सन्मान पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** पत्रकारितेसोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या रायगड प्रेस क्लब या संघटनेचा २१ वा वर्धापन दिन तसेच पनवेल महानगर प्रेस क्लबचा प्रथम वर्धापन दिन निमित्त पत्रकारिता, सामाजिकसेवा विशेष सन्मान सोहळा आज (दि. ०८) पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी राज्याचे मत्स्य व बंदर विकास मंत्री नितेश राणे आणि विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या हस्ते पनवेल येथील पत्रकार हरेश साठे यांचा रायगड जिल्हा श्रमिक पत्रकारिता सन्मान पुरस्काराने गौरव करण्यात आला. मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त व रायगड प्रेस क्लबचे संस्थापक एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नितीन पाटील, झी २४ तास वृत्तवाहिनीचे संपादक कमलेश सुतार, मराठी पत्रकार परिषद अध्यक्ष मिलिंद



अष्टिवकर, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष कामगारनेते महेंद्र घरत, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, नगरसेवक प्रथमेश सोमण, मराठी पत्रकार परिषद कोकण विभाग सचिव मनोज खांबे, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांच्यासह रायगड प्रेस क्लब तसेच पनवेल महानगर प्रेस क्लबचे पदाधिकारी आणि शेकडो पत्रकार, विविध संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# शाहूमहाराज पुरस्काराने ॲड .गोपाळ शेळके जबलपूर येथे सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** रायगड ( कर्जत ) चे किसान सभा रायगडचे अध्यक्ष ॲड.गोपाळ शेळके यांना त्यांच्या सामाजिक,सांस्कृतिक, राजकीय,साहित्यिक सेवेचा विचार करून अखिल भारतीय कुर्मी महासभा जबळपूर मध्यप्रदेश येथे भव्य सोहळयात मान्यवरांच्या उपस्थितीत ५/४/२६ सन्मानित करण्यात आले.कुर्मी महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष व्ही.एस.निरंजनदास, राष्ट्रीय महिलाध्यक्ष लताऋषी चंद्रकांत,महासचिव उमेषकुमार, केंद्रीय संघटक एल.पी.पटेल, महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष संजय पाटील,राज्य महासचिव जयेश शेलार, अण्णा घारे,ॲड.भारती ढाकवळ,ॲड.प्रीती शेळके,चिंतू दाभाडे, राजाराम मोहिते, रमेश आंबवणे इ.ची



प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाला रायगड जिल्ह्यातील ४० कार्यकर्ते उपस्थित होते.अतिशय मेहनती, प्रामाणिक, आणि कार्यक्षम कार्यकर्त्यांला देशातून शाहूमहाराज पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने कोमसाप अध्यक्ष नमिताताई कीर, कार्याध्यक्ष प्रदीप ढवळ, विश्वस्त साहित्य रत्न प्रा.एल.बी.पाटील, रायगड अध्यक्ष संजय गुंजाळ, गणेश कोळी,रेखा कोरे,पुरुषोत्तम मुळे,मच्छिंद्र म्हात्रे इत्यादींनी कोमसाप तर्फे अभिनंदन केले.

# जाते लाडाची लेक आज सासरी

**दैनिक युवक आधार**

**माहुर :प्रतिनिधी/ सय्यद ईसा :** मौजे भंडारी येथील प्रतिष्ठित नागरिक श्री दारासिंग राठोड यांचा मुलगा चि. रोहित आणि मांजरडा येथील स्व महादेव पवार यांची कन्या चि.सौ.का.दिपाली यांचा विवाह सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.पाहुणे मंडळीच्या मनोरंजनासाठी व प्रबोधनासाठी सिने कलावंत डॉ.सुनिल चव्हाण यांच्या जिव्हाळा कला संच यांना निमंत्रित करण्यात आले होते.ग्रुप मधील कलावंत ऑर्गन डी.जी.साखरे.ढोलकी सम्राट अशोक इंगोले.तबला वादक शिवाजी चौरे. आक्टोपॅड राजेश




मेश्राम.गायक रोशन आडे. गायक अंकुश कोटरंगे .गायिका मोहिनी राठोड.गायिका कू.रक्षा राघोर्ते .मॅनेजर विलास राठोड यांनी सुंदर अशी भावगीते भक्तिगीते हिंदी मराठी व बंजारा गीते सादर केली.डॉ.सुनिल चव्हाण यांनी स्व.प्रल्हाद शिंदे यांच्या आवाजात अजरामर राहिलेलं गीत ...जाते लाडाची लेक आज सासरी....या गीताने पाहुणे मंडळी अक्षरशः भारावून गेली होती.

काही वेळा साठी वातावरण शांततामय झाले होते दोन्ही परिवारा तर्फे डॉ.सुनिल चव्हाण यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

# मोहफुल आदिवासी जीवनशैलीचा कणा; रानमेवा मोहफुल संस्कृती आणि आरोग्याचा संगम

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी/ राजू गायकवाड (मोहदरी) :** निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी बांधवांसाठी मोह हा केवळ एक वृक्ष नसून ते त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सध्या मोहफुलांचा हंगाम सुरू असून, रानावनात मोहाचा सुगंध दरवळत आहे. आदिवासी समाजात 'कल्पवृक्ष' मानल्या जाणाऱ्या या मोहफुलांचे महत्त्व आता केवळ परंपरांपुरते मर्यादित न राहता, त्याचे औषधी आणि आर्थिक फायदेही जगासमोर येत आहेत उमरखेड तालुक्यातील धनज,मोहदरी,आडद,पिंपळदरी,खोकलेवाडी, तरोडा आणि विशेष म्हणजे बंदी भागातील आदिवासी गावात मोहफुलाचा मोठा हंगाम सुरु आहे यामुळे आदिवासी बांधवांना रोजगाराची उपलब्धता होत आहे.शिवाय मोहफुलांमध्ये निसर्गत अनेक पोषक घटक असतात, जे मानवी शरीरासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात मोहफुलांमध्ये साखरेचे प्रमाण नैसर्गिकरित्या जास्त असल्याने त्यातून शरीराला त्वरित ऊर्जा मिळते शिवाय लोहाचे प्रमाण भरपूर असल्याने ॲनिमिया किंवा रक्ताची कमतरता असलेल्या लोकांसाठी मोहफुल अत्यंत गुणकारी आहे.पोटाच्या विकारांवर आणि पचन सुधारण्यासाठी मोहफुलांचा उपयोग पारंपारिक औषध म्हणूनही केला



जातो आदिवासी समाज मोहफुलांचा वापर विविध प्रकारे करतो. सुकवलेली मोहफुले साठवून ठेवून ती वर्षभर अन्नासाठी वापरली जातात. या फुलांपासून लाडू, लापशी आणि इतर खाद्यपदार्थ बनवले जातात. सध्याच्या काळात मोहफुलांपासून जाम, जेली आणि बिस्किटे बनवण्याचे नवनवीन प्रयोगही काही राज्यात केले जात आहेत, ज्यामुळे आदिवासी कुटुंबांना चांगला रोजगार उपलब्ध होत आहे.

मोहफुलाला योग्य बाजारपेठ आणि प्रक्रियेसाठी आधुनिक तंत्रज्ञान मिळाल्यास, आदिवासी समाजाच्या आर्थिक स्तरात मोठी सुधारणा होऊ शकते. वनोपजावर आधारित उद्योगांना चालना दिल्यास मोहफुलाचे हे निसर्गदत्त वरदान खऱ्या अर्थाने समृद्धीचे साधन ठरेल.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती – सावनेर शाखेची २०२६ ते २०२८ नवनिर्वाचित समिती जाहीर

**दैनिक युवक आधार**

**डॉ. सुनिल भगत/ प्रतिनिधी, नागपूर :** सावनेर, नागपूर (७ एप्रिल २०२६) – महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सावनेर शाखेची नवी कार्यकारिणी आज सावनेर येथे आयोजित बैठकीत जाहीर करण्यात आली. वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक प्रबोधन आणि अंधश्रद्धाविरोधी चळवळ अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने ही समिती २०२६ ते २०२८ कालावधीसाठी गठित करण्यात आली.

**नवीन समितीचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे :**

अध्यक्ष : ताराचंद मेश्राम

कार्यकारी अध्यक्ष : गुरुदेव




बॉंबोर्डे

उपाध्यक्ष : वंदना मेश्राम

सचिव : प्रकाश डवरे

**विशेष विभाग प्रमुख :**

बुवाबाजी संघर्ष कार्यवाह – बाबुराव गायकवाड

वैज्ञानिक जाणीव प्रकल्प कार्यवाह – संजय सायरे

महिला सहभाग कार्यवाह – प्रिया बागडे

विविध उपक्रम कार्यवाह – सतीश बगडे

सांस्कृतिक विभाग कार्यवाह – तुकाराम दुपारे

जातीअंत विभाग कार्यवाह – गणेश झोडापे

रिक्त पदे (लवकरच भरली जाणार):

वार्तापत्र प्रकाशन, मानसिक आरोग्य विभाग, प्रशिक्षण विभाग, सोशल मीडिया, युवा विवेक वाहिनी, कायदा कार्यवाह.

या नव्या समितीच्या स्थापनेप्रसंगी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे, देवानंद बडगे, नागपूर जिल्हा शाखेचे कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे तसेच प्रधान सचिव डॉ. सुनिल भगत यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. सावनेरमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी नवनिर्वाचित समिती कटिबद्ध असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

# व्हॉइस ऑफ मीडिया च्या भंडारा जिल्हाध्यक्षपदी शशिकांत भोयर यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/भंडारा :** पत्रकारिता क्षेत्रात निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समाजहिताची जाणीव जपत उल्लेखनीय कार्य करणारे शशिकांत भोयर यांची व्हॉइस ऑफ मीडिया या प्रतिष्ठित पत्रकार संघटनेच्या भंडारा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शशिकांत भोयर यांनी आपल्या पत्रकारितेच्या प्रवासात नेहमीच सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. सामाजिक, शैक्षणिक, ग्रामीण भागातील समस्या तसेच प्रशासनातील त्रुटींवर त्यांनी निर्भीडपणे प्रकाश टाकला आहे. त्यांच्या लेखणीतून समाजातील



वंचित, शोषित घटकांना न्याय मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न दिसून येतो. त्यांच्या या अमूल्य योगदानाची दखल घेत व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेने त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील पत्रकारांना एकत्रित करून पत्रकारितेची गुणवत्ता वाढविणे, पत्रकारांचे प्रश्न सोडविणे आणि समाजहिताच्या विषयांवर प्रभावी आवाज उठविणे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

निवडीनंतर बोलताना शशिकांत भोयर यांनी सांगितले की, "ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानासोबतच मोठी जबाबदारी आहे. पत्रकारांच्या हक्कांसाठी, तसेच समाजाच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे."

जिल्ह्यातील विविध सामाजिक, राजकीय आणि पत्रकार क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# नांदूरमधमेश्वर शाळेची 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' योजनेत निवड

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांमुळे येवला मतदारसंघातील निफाड तालुक्यातील नांदूरमधमेश्वर येथील जिल्हा परिषद शाळेची 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत निवड करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणेच आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे, हा मंत्री भुजबळ यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे. त्यांच्या दूरदृष्टीतूनच नांदूरमधमेश्वर येथील शाळेला ही मोठी संधी प्राप्त झाली आहे. या योजनेअंतर्गत शाळेत सुसज्ज इमारत, अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा, डिजिटल वर्गखोल्या यांसारख्या सुविधा उभारल्या जाणार असून विद्यार्थ्यांना अधिक सक्षम शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार आहे.

या योजनेमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या बौद्धिक तसेच सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे. विशेषतः विद्यार्थिनींसाठी 'पिंक रूम'सारखी सुविधा तसेच क्रीडा क्षेत्रासाठी क्रीडा प्रबोधिनी उभारण्यात येणार असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीला नवे बळ मिळेल. शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि ग्रामीण शाळांचे सक्षमीकरण करणे या उद्दिष्टासाठी मंत्री भुजबळ सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

दरम्यान, या निवडीबद्दल परिसरातून आनंद व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे निफाड पूर्व भाग तालुका अध्यक्ष हरिश्चंद्र भवर यांनी सांगितले की, "येवला-लासलगाव मतदारसंघासाठी ही अभिमानाची बाब आहे. मंत्री भुजबळ यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. त्यांनी नेहमीच या परिसराच्या विकासासाठी पुढाकार घेत मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत."

या निर्णयामुळे नांदूरमधमेश्वर परिसरातील शैक्षणिक विकासाला नवी दिशा मिळणार असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे.

# धानोरा गावात मटन मार्केटचा जीवघेणा वळण – दारूच्या महापुरात ग्रामस्थ त्रस्त !

## धोकादायक वळणावर बाजार, अपघाताची भीती वाढली

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : राळेगाव तालुक्यातील धानोरा गावात दर मंगळवारी भरणारा बाजार सध्या नागरिकांच्या जीवावर बेतणारा ठरत आहे. गावातील भाजीपाला मार्केट आतमध्ये असताना, मटन मार्केट मात्र धोकादायक वळणावरच भरवले जाते, त्यामुळे प्रत्येक आठवड्याला अपघाताची भीती वाढत चालली आहे.



या वळणावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने ये-जा करणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होतो. त्यातच रेती तस्करांची विना परवाना ओव्हरलोड वाहतूक आणि अतिवेग यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. या जड वाहतुकीमुळे रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून, वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

बाजाराच्या दिवशी दुकानदार अक्षरशः रस्त्यावरच दुकाने लावतात, त्यामुळे वाहतुकीसाठी जागाच उरत नाही. वाठोडा, वनोजा आणि येवतीकडे जाणारी वाहने तसेच शेतातून येणाऱ्या बैलबंडी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. वर्दळीच्या ठिकाणी भरत असलेल्या या बाजारामुळे कधीही मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दारूच्या महापुरामुळे गावात असंतोष दरम्यान, मटन मार्केटलगतच असलेले देशी दारूचे दुकान गावासाठी आणखी एक गंभीर समस्या ठरत आहे. येथे रोज मोठ्या प्रमाणात दारूची विक्री होत असून, गावात अक्षरशः दारूचा महापूर वाहताना दिसतो. ग्रामस्थांनी अनेकदा दारूबंदीची मागणी केली, मात्र त्यांच्या प्रयत्नांना यश आलेले नाही.

यामुळे गावातील तरुण पिढी व्यसनाधीन होत चालली असून, सामाजिक वातावरण बिघडत आहे. काही नागरिकांनी तर प्रशासन आणि पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दारू विक्रेत्यांवर कारवाई का होत नाही? हप्तेखोरीमुळे दुर्लक्ष केले जाते का? असे सवाल आता उघडपणे विचारले जात आहेत.

ग्रामपंचायतीकडून दुर्लक्षाचा आरोप ग्रामस्थांचा आरोप आहे की, दुकानदारांकडून ग्रामपंचायत टॅक्स वसूल केला जातो, मात्र त्याबदल्यात सुरक्षित जागा उपलब्ध करून देण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

एकीकडे अपघाताचा धोका आणि दुसरीकडे दारूचे वाढते प्रमाण, यामुळे धानोरा गावातील नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

धानोरा गावातील मटन मार्केट सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करणे, धोकादायक वळणावरील अतिक्रमण हटवणे, ओव्हरलोड वाहतुकीवर कडक कारवाई करणे आणि देशी दारूच्या विक्रीवर नियंत्रण आणणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना होऊन जीवितहानी होऊ शकते. यासाठी संबंधित प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अन्यथा ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे लागेल.

# उन्हाळ्याच्या पूर्वतयारीसाठी विविध भागांत आज वीज बंद; महावितरणचे सहकार्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : कडाक्याचा उन्हाळा लक्षात घेता, वीज ग्राहकांना उन्हाळ्यात अखंडित सेवा मिळावी यासाठी महावितरणने कंबर कसली आहे. ग्रीष्म ऋतूतील संभाव्य तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी महावितरणतर्फे बुधवारी, 8 एप्रिल रोजी शहरातील विविध विभागांमध्ये वीजवाहिन्यांची देखभाल, दुरुस्ती आणि झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात येणार आहे. या तातडीच्या कामासाठी नागपुरातील अनेक भागांचा वीजपुरवठा सकाळी काही तासांसाठी बंद राहणार असून, ग्राहकांनी या काळात महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कॉंग्रेसनगर विभागात कामाचे स्वरूप पाहता विविध गटांत वीज पुरवठा खंडित राहील. सकाळी ९ ते १२ या वेळेत नेल्को सोसायटी, सुमित नगर, अध्यापक लेआउट, आझाद हिंद नगर, टाकळी सिम पाण्याची टाकी परिसर आणि एलआयजी-एमआयजी कॉलनीमध्ये वीज नसेल. सकाळी ८ ते ११ दरम्यान जय बद्रीनाथ सोसायटी, राऊत वाडी, लोकसेवा नगर, मनीष लेआउट, गायत्री नगर, परसोडी आणि हनुमान मंदिर परिसरातील वीज पुरवठा बंद राहील. तसेच स्वावलंबी नगर, दिनदयाल नगर (सकाळी ८:३० ते १२) आणि जयप्रकाश नगर, सीता नगर, महालक्ष्मी मंदिर परिसर (सकाळी ८ ते १२) या भागातही देखभाल कार्य चालणार आहे. महाजन मार्केट आणि आयुर्वेदिक मार्केटमध्ये सकाळी ८ ते १०, तर इटरनिटी मॉल, व्हीआयपी रोड, काचीपुरा आणि सेंट्रल मॉल परिसरात सकाळी ७ ते १० या वेळेत वीज पुरवठा खंडित असेल.

महाल विभागांतर्गत ओंकार नगर, जयवंत नगर, साई नगर आणि गजानन नगर भागात सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद राहील. अयोध्या नगर, उदय नगर चौक आणि साई मंदिर परिसरात सकाळी ७:३० ते १२:३० पर्यंत, तर मेडिकल चौक, रामबाग कॉलनी, जाटतरोडी आणि टी.बी. वार्ड परिसरात सकाळी ९ ते दुपारी १:३० वाजेपर्यंत तांत्रिक कामे केली जातील. त्यामुळे या बागातील वीज पुरवठा खंडित राहील.

बुटीबोरी विभागातील काचीमेट, शांतीनगर आणि संत जगनाडे नगर भागात सकाळी ७ ते १२ वीज बंद असेल. एमआयडीसी उपकेंद्रातील औद्योगिक ग्राहकांसह रिलायन्स सिमेंट आणि ईशान कास्टींग यांसारख्या मोठ्या उद्योगांचा वीजपुरवठा सकाळी १० वाजल्यापासून बंद ठेवण्यात येणार आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत ग्राहकांना तांत्रिक बिघाडामुळे त्रास होऊ नये, यासाठी नवीन एबी स्विच बसवणे आणि ट्रान्सफॉर्मरची देखभाल करणे अनिवार्य आहे.

या नियोजित कामामुळे होणाऱ्या तात्पुरत्या गैरसोयीबद्दल महावितरणने दिलगिरी व्यक्त केली असून, नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सिल्लोडच्या १२ रुग्णांवर होणार मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड:-** नॅशनल आयुर्वेदिक हॉस्पिटल, सिल्लोड आणि लायन्स क्लब, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरातून शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या १२ रुग्णांना बुधवारी (दि. ८) पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगरकडे रवाना करण्यात आले.

सोमवारी (दि. ६) नॅशनल आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये हे शिबिर पार पडले. यात तज्ज्ञ डॉक्टरांनी सुमारे १०० रुग्णांची नेत्रतपासणी केली. त्यापैकी मोतीबिंदू शस्त्रक्रियेची गरज असलेल्या १२ गरजू रुग्णांची अंतिम निवड करण्यात आली. या रुग्णांवर लायन्स क्लब, छत्रपती संभाजीनगर येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.



बुधवारी सकाळी रुग्णांना रुग्णालयातून निरोप देण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष अब्दुल समीर अब्दुल सत्तार आणि जिल्हा परिषद सदस्य ॲड. अब्दुल आमेर अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. नगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली व यशस्वी शस्त्रक्रियेसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी डॉ. अहेमद शरीफ, डॉ. विशाल आकाते यांच्यासह रुग्णालयीन कर्मचारी उपस्थित होते. नॅशनल आयुर्वेदिक हॉस्पिटलच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बालमृत्यू दफनभूमीसाठी शासन स्तरावर जागा उपलब्ध करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : बालमृत्यू दफनभूमीसाठी शासन स्तरावर पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, परिसरात जागा उपलब्ध करून देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे सरचिटणीस विनायक गांधी यांनी आमदार विक्रांत पाटील आणि जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे केली आहे. वाढते प्रदूषण तसेच निसर्गाच्या हानीमुळे मानवी जीवन जिकरीचे झाले आहे. सध्याच्या युगात नव्याने जन्माला येणाऱ्या नवोदयात बालकांमध्ये कमी दिवसात जन्माला येणारे बालकांचे प्रमाण वाढत आहे. अशातच सहाव्या आणि आठव्या महिन्यात जन्माला आलेली मुले अवयवात योग्य वाढ होत नसल्याने बहुदा मृत्युमुखी पडतात अशा आणि इतर मयत बालकांच्या मृत्यूच्या संख्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. पनवेल हद्दीत अशा प्रसंगी मयत बालकांच्या शवाला दफन करण्यास नातेवाईकांना बहुदा दफन जागेअभावी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अनेक तास या मयत बालकाच्या शवाची हेळसांड होत असते. अंतिम संस्कारात विघ्न आल्याने मृतांच्या नातेवाईकांचे हाल होत आहेत.

तरी याविषयी गांभीर्याने लक्ष देऊन मयत बालकांच्या शवासाठी दफनभूमीच्या जागेची व्यवस्था उपलब्ध करून नातेवाईकांची होत असलेली अवहेलना दूर करावी अशी मागणी विनायक गांधी यांनी केली आहे.

# बनावट प्रमाणपत्रांना लगाम : निफाड तहसीलकडून QR कोडसह नवे प्रमाणपत्र स्वरूप

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी** : नागरिकांना अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा पुरवण्याच्या उद्देशाने निफाड तहसील कार्यालयाने प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. आता तहसील कार्यालयामार्फत दिली जाणारी सर्व प्रकारची प्रमाणपत्रे 'हायटेक' स्वरूपात उपलब्ध होणार असून त्यावर अर्जदाराचा फोटो आणि QR कोड अनिवार्य करण्यात आला आहे.

या नव्या प्रणालीअंतर्गत जात, उत्पन्न, रहिवासी, नॉन-क्रीमी लेयर आदी विविध प्रमाणपत्रांवर अर्जदाराचा छायाचित्रासह QR कोड छापण्यात येणार आहे. QR कोड स्कॅन केल्यास संबंधित प्रमाणपत्राची तत्काळ ऑनलाइन पडताळणी करता येणार आहे. त्यामुळे शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था तसेच इतर यंत्रणांमध्ये प्रमाणपत्रांची सत्यता पडताळण्याची प्रक्रिया अधिक जलद, सोपी आणि विश्वासार्ह होणार आहे.

यामुळे बनावट प्रमाणपत्रांच्या प्रकारांना मोठ्या प्रमाणात आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच प्रमाणपत्रावर अर्जदाराचा फोटो असल्यामुळे त्याचा गैरवापर होण्याची शक्यता कमी होणार आहे.

नवीन प्रणालीमध्ये अर्जदाराचा मोबाईल क्रमांकही नोंदवला जाणार असून अर्जाच्या स्थितीची माहिती थेट मोबाईलवर मिळणार आहे. यामुळे नागरिकांना वारंवार कार्यालयात येण्याची गरज कमी होऊन त्यांचा वेळ व श्रम वाचणार आहेत.

तहसील कार्यालयाने नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रमाणपत्रांसाठी अर्ज करताना आवश्यक माहिती अचूक व पूर्ण द्यावी आणि या आधुनिक सुविधेचा लाभ घ्यावा.

तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी सांगितले की, "प्रमाणपत्रांवर QR कोड व अर्जदाराचा फोटो समाविष्ट केल्यामुळे बनावट प्रमाणपत्रांवर नियंत्रण मिळवता येईल. QR कोड स्कॅन करून प्रमाणपत्रांची तत्काळ पडताळणी करता येईल.

तसेच मोबाईल नंबर जोडल्यामुळे अर्जदारांना अर्जाची सद्यस्थिती समजेल, ज्यामुळे नागरिकांचा वेळ वाचेल आणि सेवा अधिक सुलभ होईल."

# पत्रकार परिषदेत दारूमुक्तीचा बिगुल; १६ एप्रिलला 'आडवी बाटली' जिंकवण्यासाठी महिलांना थेट आवाहन !

**दैनिक युवक आधार**
**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ)** : प्रभाग क्रमांक १ मधील देशी दारू दुकान व वाईन बार कायमस्वरूपी बंद करण्याच्या प्रश्नावर आयोजित पत्रकार परिषदेत दारूमुक्तीचा ठाम बिगुल वाजवण्यात आला. नगरविकास आघाडीचे तेरा नगरसेवक या भूमिकेसाठी सज्ज झाले असून, १६ एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानात महिला मतदारांनी 'आडवी बाटली' या पर्यायाला मोठ्या प्रमाणावर मतदान करावे, असे थेट आवाहन करण्यात आले.




पत्रकार परिषदेत नगराध्यक्षांसह पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडत, "हे मतदान केवळ औपचारिकता नसून समाजाच्या भवितव्याचा निर्णय आहे. दारूमुळे कुटुंबांवर होणारे दुष्परिणाम थांबवण्यासाठी महिलांनी निर्णायक भूमिका घ्यावी," असे सांगितले.

या आंदोलनाची धुरा नगरसेविका सौ. जयश्री संजय नरवाडे यांनी हाती घेतली आहे. त्यांनी सांगितले की, प्रभागातील महिला व शाळकरी मुलींना होणारा त्रास लक्षात घेऊनच हा लढा उभा केला आहे. यात माझा कोणताही वैयक्तिक हेतू नाही.

नगराध्यक्ष सौ. रंजना दीपक आडे यांनीही ठाम पाठिंबा दर्शवत, "हा लढा कुण्या एकट्याचा नसून संपूर्ण महागावचा आहे. सर्व नगरसेवक एकत्र येऊन हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील आहोत,असे स्पष्ट केले.माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक सुरेश पाटील नरवाडे यांनी विषयाची सविस्तर माहिती दिली. यावेळी नगराध्यक्ष सौ. रंजना आडे, उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे,जेष्ठ नेते तथा नगरसेवक रामराव पाटील नरवाडे, सुरेश पाटील नरवाडे,विशाल पांडे, परवेज सुरैया, सौ. जयश्री नरवाडे, जयश्री इंगोले, सुनीता डाखोरे, गजानन साबळे आदी उपस्थित होते.

दरम्यान,माजी अर्थ व बांधकाम सभापती तथा नगरसेवक गजानन साबळे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत,वाईन बार बंद करण्याच्या मतदानात माझा सहभाग नाही; मात्र देशी दारू दुकान बंद करण्यासाठी 'आडवी बाटली'ला मत देण्याच्या मताचा मी आहे,असे जाहीर केले.

एकंदरीत,पत्रकार परिषदेतून दारूमुक्तीच्या लढ्याला धार मिळाली असून,आडवी बाटली की उभी बाटली' या निर्णयाकडे आता संपूर्ण महागावचे लक्ष लागले आहे.

# रिसोड येथे गुरुवारी विदर्भ वंजारी समाजसेवा परिषदेची महत्त्वपूर्ण बैठक; नव्या नियुक्त्या व संघटनात्मक विषयांवर होणार चर्चा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड ( प्रतिनिधी )/रणजितसिह. ठाकूर** : विदर्भ वंजारी समाजसेवा परिषदेच्या वतीने एक महत्त्वपूर्ण बैठक गुरुवार, ९ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता रिसोड येथील आर्या कॅफे येथे आयोजित करण्यात आली आहे.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी विदर्भ वंजारी समाजसेवा परिषदेचे जिल्हाध्यक्ष बबनराव सानप हे राहणार आहेत. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा संघटक प्रा. ज्ञानेश्वर मुंडे आणि विदर्भ उपाध्यक्ष डॉ. सुरेश गरकळ यांची उपस्थिती राहणार आहे. या बैठकीत विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली जाणार असून, वाशिम जिल्हा कार्यकारिणी, तालुका कार्यकारिणी तसेच शहर कार्यकारिणीच्या रचना व नियुक्त्यांबाबतही निर्णय घेतले जाणार आहेत. या बैठकीस वाशिम जिल्ह्यासह तालुक्यातील वंजारी समाजातील सर्व नवयुवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विदर्भ वंजारी समाजसेवा परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.ही माहिती जिल्हा प्रसिद्धीप्रमुख केशव गरकळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# लोणी खु व बु सेवा सहकारी सोसायटीत बँक निवडणुकीसाठी बिनविरोध ठराव



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - अरविंद पांचाळ** : अर्धापूर तालुक्यातील लोणी खु व लोणी बु सेवा सहकारी सोसायटीच्या बँक निवडणुकीसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, चेअरमनपदासाठी श्री सुनील रामजी पाटील शिंदे यांच्या नावाने सर्वानुमते बिनविरोध ठराव मंजूर करण्यात आला आहे.

दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सोसायटीच्या सर्व संचालक मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत एकमताने हा ठराव संमत करण्यात आला. या निर्णयामुळे दोन्ही गावांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रसंगी सर्व संचालक मंडळ तसेच लोणी खु व लोणी बु येथील गावकऱ्यांनी एकदिलाने सहकार्य केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व धन्यवाद व्यक्त करण्यात आले.या बैठकीस उपस्थित संचालक मंडळातील मान्यवरांमध्ये श्री महेशराव बुटले, श्री अशोकराव बुटले, श्री गंगाधर बक्कवाद, श्री नागोराव खुरगावकर, श्री प्रल्हाद कापसे, श्री शिवलिंग भुसे, श्री गोविंदराव कापसे, श्री मारोतराव मामा फाटेकर, श्री गौतमराव लोने, स. जगजीतसिंग लोणीवाले, श्री दत्तराव बागल, काशिनाथराव लसिनकर, कैलास भुसे, व्यंकटराव बुटले, प्रवीण भुसे, संजय खुरगावकर, शिवशंकर खुरगावकर, कपिल खुरगावकर, मनमतराव खुरगावकर, विशाल बुटले आदी मान्यवर उपस्थित होते.या बिनविरोध निवडीमुळे सोसायटीच्या कामकाजात अधिक गती येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# देवणी तालुक्यात खरीप 2025-26 पीक कापणी प्रयोग पूर्ण

## पिक विमा मंजुरीची दाट शक्यता

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी/ पांडुरंग कदम** : देवणी तालुक्यात खरीप हंगाम 2025-26 अंतर्गत कृषी विभागामार्फत पीक कापणी प्रयोग पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यात आले असून, प्राप्त निष्कर्षांच्या आधारे तालुक्यातील तिन्ही मंडळांना पिक विमा मंजुरी मिळण्याची दाट शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

तालुक्यातील देवणी, बोरोळ व वलांडी या तिन्ही मंडळांमध्ये प्रत्येकी 12 ठिकाणी अर्धा गुंठा प्लॉटवर पीक कापणी प्रयोग राबविण्यात आले. एकूण 36 ठिकाणी प्रयोग करून उत्पादनाचे प्रतिहेक्टरी मूल्यांकन करण्यात आले.

PRADHAN MANTRI FASAL BIMA YOJANA

*सोयाबीन पिकाचे उत्पादन* :

देवणी मंडळात प्रतिहेक्टरी 1081.167 किग्रॅ (10 क्विंटलपेक्षा जास्त) उत्पादन नोंदविण्यात आले. बोरोळ मंडळात 858.000 किग्रॅ (8 क्विंटल 58 किलो), तर वलांडी मंडळात 1082.167 किग्रॅ (10 क्विंटल 82 किलो) उत्पादन मिळाले. एकूण तालुक्याची सरासरी 1007.111 किग्रॅ प्रतिहेक्टरी (10 क्विंटलपेक्षा जास्त) झाली आहे.

*उडीद पिकाचे उत्पादन* :

देवणी मंडळात 1020.333 किग्रॅ (10 क्विंटल 20 किलोपेक्षा जास्त), बोरोळ मंडळात 934.000 किग्रॅ (9 क्विंटल 34 किलो) व वलांडी मंडळात 1109.500 किग्रॅ (11 क्विंटल 9 किलो) उत्पादन मिळाले. तालुक्याची सरासरी 1043.333 किग्रॅ (10 क्विंटलपेक्षा जास्त) नोंदविण्यात आली.

*मूग पिकाचे उत्पादन* :

देवणी मंडळात 1056.333 किग्रॅ, बोरोळ मंडळात 1062.667 किग्रॅ, तर वलांडी मंडळात 947.667 किग्रॅ (9 क्विंटल 47 किलो) उत्पादन मिळाले. एकूण तालुक्याची सरासरी 1003.667 किग्रॅ प्रतिहेक्टरी झाली आहे.तिन्ही मंडळांपैकी सोयाबीन व उडीद पिकात बोरोळ मंडळाचे उत्पादन तुलनेने कमी आढळले आहे.

सदर अहवाल देवणी तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत संबंधित प्रशासकीय यंत्रणा व प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत विमा कंपनीकडे पाठविण्यात आला आहे. विमा मंजुरीसाठी मागील पाच वर्षांच्या पीक कापणी प्रयोगांच्या सरासरी उत्पन्नाचा विचार करून उंबरठा उत्पादन निश्चित केले जाते. त्यानुसार 2025-26 या हंगामात देवणी तालुक्यातील तिन्ही मंडळांना पिक विमा मंजूर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, रब्बी हंगाम 2025-26 साठी पीक कापणी प्रयोग अद्याप पूर्ण झाले नसून, ते पूर्ण झाल्यानंतरच विमा संदर्भातील पुढील प्रक्रिया होणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.महत्वाचे म्हणजे, मागील तीन वर्षांत अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना तक्रार (ट्रिगर) नोंदविण्याची सुविधा उपलब्ध होती. मात्र, 2025-26 हंगामासाठी ही ट्रिगर सुविधा बंद करण्यात आली असून, केवळ पीक कापणी प्रयोगांच्या अहवालावर आधारितच पिक विमा मंजूर किंवा नामंजूर होणार आहे. पुढील 2026-27 हंगामात अतिवृष्टी नुकसानासाठी तक्रार निवारण (ट्रिगर) सुविधा पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती विभागाने दिली आहे.

# नेरेपाडा येथील जलजीवन मिशन योजनेचे काम रखडले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : नेरेपाडा येथील जलजीवन मिशन योजनेचे जवळपास ३० टक्के काम पूर्ण झाले असून अद्याप ७० टक्के काम पूर्ण होणे बाकी आहे. मात्र बऱ्याच महिन्यांपासून हे काम रखडले आहे. ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे येथील काम पूर्ण झालेले नाही.नेरेपाडा येथील योजनेचे काम ८५ लाख रुपयांचे असून येथील विहिरीचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच गावांमध्ये पाईपलाईन देखील टाकून पूर्ण झालेली आहे. विहिरीचे किरकोळ काम बाकी असून वितरण वाहिणीचे देखील किरकोळ काम बाकी आहे. तसेच येथील पंपिंग मशिनरी, पंप हाऊस आणि फिल्टरचे काम बाकी आहे. मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून येथील काम रखडले आहे. ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे येथील काम पूर्ण झालेले नाही. काम पूर्ण होण्यासाठी अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले, त्यानंतर ठेकेदाराला पाणीपुरवठा विभागाकडून सहा नोटिसा पाठवल्या. तसेच दंडाची नोटीस देखील पाठवण्यात आली. मात्र ठेकेदाराकडून काहीही उत्तर आलेले नाही. काम अर्धवट असल्याने ठेकेदाराला पेमेंट देखील दिले नसल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आले नाही. त्यामुळे हे काम कधी सुरू होणार आणि जलजीवन मिशन योजना कधी पूर्ण होणार असा सवाल उपस्थित झाला आहे.

# 125 मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना पाठवल्या कारणे दाखवा नोटीस

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार छायाचित्र मतदार यादयांची प्रतवारी सुधारण्यासाठी आणि त्या अचूक होण्यासाठी 188 पनवेल विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. मात्र निवडणूक कामासाठी उपस्थित न राहिल्याबाबत मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी तब्बल 125 शिक्षकांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. पनवेल विधानसभा मतदारसंघातील सर्व केंद्रस्तरीय अधिकारी यांनी मतदारांचे मॅपिंग करणे, मतदार यादीतील अस्पष्ट फोटो असलेल्या मतदारांचे रंगीत फोटो घेऊन अद्ययावत करणे, डीएसईच्या नोंदीचे पडताळणी करणे इत्यादी कामांसाठी 18 मार्च ते 15 एप्रिल या कालावधीसाठी पूर्ण वेळ कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यांना निवडणुकीच्या कामकाज करण्यासाठी सुचित करण्यात आले आहे. पनवेलमधून शिक्षक, शासकीय कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका असे एकूण 574 बीएलओची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच 12 नोडल ऑफिसर, 57 सुपरवायझर आणि पाच एइआरओ यांची नियुक्ती करण्यात आली. निवडणूक कामासाठी उपस्थित राहण्याबाबत पर्यवेक्षकांनी बीएलओ यांना दूरध्वनीमार्फत कळवले आहे. मात्र बीएलओ यांनी उपस्थिती दाखवलेली नाही. तसेच कामासाठी अनुपस्थित असल्याबाबतचा अहवाल देखील सादर केलेला नाही. याबाबतचा खुलासा मतदार नोंदणी अधिकारी यांनी त्यांच्याकडे मागितला आहे. निवडणुकीचे काम केले नाही तर प्रशासकीय आणि फौजदारी कारवाई करण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

# मेंडका येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त नियोजन बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी -प्रकाश गवारे:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी सम्राट अशोका बुद्ध विहार, भिम नगर, मेंडका येथे नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीदरम्यान जयंती उत्सव यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यानुसार अध्यक्षपदी राजरत्न मोहन निखाते यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी नागेश पिराजी निखाते यांची निवड करण्यात आली आहे. सचिव म्हणून गौतम नामदेव निखाते तर कोषाध्यक्षपदी सुमेध अशोक निखाते यांची जबाबदारी देण्यात आली आहे.

याशिवाय संघटक म्हणून माधव राजेश लोणे यांची निवड करण्यात आली आहे. सदस्य म्हणून



सुनिल भिमराव हाटकर, दत्ता नारायण नरवाडे, प्रणव राजु थोरात, सचिन गौतम निखाते, अनिल सोपान निखाते, प्रविण संजय निखाते आणि माधव कमलाकर निखाते यांची निवड करण्यात आली आहे.

या बैठकीत उपस्थितांनी जयंतीनिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच गावातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

# आक्काताई मेघाजी बनसोडे यांचे दुःखद निधन

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी / (रघुनाथ देवकर)** : राजेवाडी येथील व सद्गुरु श्री श्री साखर कारखान्यातील कामगार महादेव (आबा) मेघाजी बनसोडे यांच्या मातोश्री सौ आक्काताई मेघाजी बनसोडे 67 वर्ष यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच आप्तस्वकीय, नातेवाईक पाहुणेरावळे, ग्रामस्थ यांनी अंत्यदर्शनासाठी बहु गर्दी केली. त्यांचा स्वभाव मायाळू व लोकप्रिय होता.त्यांच्या जाण्याने समाजात मोठी पोकळी



निर्माण झालेली आहे व बनसोडे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. उपस्थितांनी त्यांच्या आठवणी सांगून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी सद्गुरु श्री. श्री. साखर कारखान्याचे चेअरमन एन. शेषगिरी रावसर, व्हाईस चेअरमन डॉ. बाळासाहेब कर्णवर पाटील संचालिका उषाताई मारकड, केन मॅनेजर सुनील सावंत, विकास सेवा संस्थेचे माजी चेअरमन रवींद्र शिरकांडे, उद्योजक नईम खान पठाण ,राहुल साबळे, महादेव शिरकांडे, अजित सरतापे सुनील चव्हाण, व तसेच लोकप्रतिनिधी, समाजसेवक यांनीही बनसोडे परिवाराचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात पती, दोन विवाहित मुली, एक मुलगा व नातवंडे असा परिवार आहे.

# मालेगावची अर्थवाहिनी 'मामको' बँकेची गरुडझेप; ८ कोटी १७ लाखांचा विक्रमी नफा, सभासदांना १०% लाभांश मिळणार!

**नाशिक** : मालेगाव शहराची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दि मालेगाव मर्चन्टस् को. ऑप बँक लि. (मामको बँक) या बँकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. ३१ मार्च अखेर बँकेला ८ कोटी १७ लाख २१ हजार रुपयांचा विक्रमी ढोबळ नफा झाला असल्याची माहिती बँकेच्या अध्यक्षा मनिषा देवरे यांनी दिली आहे. बँकेच्या ठेवींमध्ये दरवर्षी वाढ होत आहे, तसेच बँकेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस मजबूत होत असल्याचा दावा देखील देवरे यांनी केला आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद मांडण्यासाठी संचालक मंडळाने बँकेच्या मुख्यालयात पत्रकार परिषद घेतली. बँकेची आर्थिक स्थिती मजबूत



असल्याने सभासदांसाठी १० टक्के (सुमारे ८० लाख रुपये) लाभांश देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. त्यानुसार रिझर्व्ह बँकेकडे शिफारस करण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### ठेवींच्या वाढीत सातत्य

सहकार क्षेत्रातील अनेक बँका सद्य:स्थितीत या-ना-त्या कारणाने अडचणीत आल्या असताना मामको बँकेने मात्र प्रगतीचा आलेख चढता ठेवण्यात यश मिळवले आहे. सभासदांच्या दृढ विश्वासामुळे दरवर्षी बँकेच्या ठेवींमध्ये वाढ होत आहे. गेल्या वर्षी २८३ कोटींच्या ठेवी जमा झाल्या होत्या. यावर्षी त्यात वाढ होऊन २८७ कोटी १६ लाख रुपयांपर्यंत एकूण ठेवी पोहोचल्या आहेत. कर्ज वाटप १५१ कोटी ४ लाख रुपयांवर गेले आहे. बँकेचा एकूण निधी ५४ कोटी १९ लाख तर गुंतवणूक १६८ कोटी ४२ लाख इतकी आहे. बँकेची स्वतःची पुंजी (नेटवर्थ) २७ कोटी ४९ लाख रुपये असून भांडवल पर्याप्तता १९.७७ टक्के इतकी समाधानकारक पातळीवर आहे. नियोजनबद्ध वसुलीमुळे बँकेने आपली अनुउत्पादक मालमत्ता (नेट एनपीए) शून्य टक्क्यांच्या खाली राखण्यात सातत्य मिळवले आहे. आधुनिक बँकिंग सेवेवर भर देताना बँकेने आरटीजीएस,एनईएफटी, एटीएम,आयएमपीएस आणि मोबाईल बँकिंग सेवा कार्यान्वित केल्या असून, लवकरच युपीआय आणि क्यूआर कोड सेवा सुरू केल्या जाणार असल्याचे देवरे यांनी सांगितले.

बँकेचे ज्येष्ठ संचालक राजेंद्र भोसले यांनी गेल्या काही वर्षांपासून बँकेचा चढता आलेख कसा उंचावत आहे आणि भविष्यात बँकिंग प्रणालीमध्ये काय सुधारणा करण्यात येणार आहेत,यावर प्रकाश टाकला.

व्यापारी आणि सर्वसामान्यांसाठी सोनेतारण व वाहन कर्ज अवघ्या ९ टक्के दराने उपलब्ध आहे, तर लघु उद्योजकांसाठी ११ टक्के व्याजदर निश्चित करण्यात आला असल्याचे भोसले यांनी नमूद केले. कर्जावरील व्याजदर अधिकाधिक आकर्षक करण्यावर बँकेचा भर आहे, असे ते म्हणाले.

# नाशिक–मुंबई रेल्वे प्रवास सुसाट! ६० लांब पल्ल्याच्या गाड्यांचा 'स्पीड' वाढला

**नाशिक** : देशातील विविध भागांतून नाशिकमार्गे मुंबईकडे जाणाऱ्या ६० लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांचा प्रवास आता अधिक वेगवान होणार आहे. या सर्व रेल्वेगाड्या सरासरी ताशी १२० ते १३० किलोमीटर वेगाने धावतात. मात्र, मध्य रेल्वेच्या नाशिक-मुंबई रेल्वे मार्गावरील अस्वली-पाडळी दरम्यान ताशी ७५ किलोमीटर वेगमर्यादेचे निर्बंध होते. भुसावळ विभागाने 'थ्रू फॉर्मेशन ट्रीटमेंट' (टीएफटीआर) यशस्वीरीत्या पूर्ण करून ही वेगमर्यादा कायमस्वरूपी हटवली आहे. यामुळे नाशिकमार्गे मुंबईला जाणाऱ्या प्रत्येक गाडीची आता ३ मिनिटे वाचतील आणि




गाड्या वेळेत मुंबईला पोहोचण्यास मदत होईल.

मध्य रेल्वेच्या नाशिक-मुंबई मार्गावर पंजाब, दिल्ली, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, ओडिशा, आसाम या राज्यांसह नागपूर, अमरावतीहून येणाऱ्या गाड्या मार्गस्थ होतात. दिवसभरात या मार्गाने मुंबईला जाणाऱ्या रेल्वेगाड्यांची संख्या ६० आहे. प्रवाशांना अधिक दर्जेदार सेवा देणे, सुरक्षितता वाढवणे आणि रेल्वेचा वेग वाढवणे या उद्देशाने पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्यावर मध्य रेल्वेचा भर आहे. त्याअंतर्गत भुसावळ विभागाने अस्वली-पाडळी विभागातील मार्गावर अत्यंत आव्हानात्मक असे 'थ्रू फॉर्मेशन ट्रीटमेंट' (टीएफटीआर) काम यशस्वीरीत्या पूर्ण केले. १६०.५७० ते १६०.१३७ किलोमीटर या अंतरादरम्यानच्या ८०० मीटर लांबीच्या पट्ट्यावर गेल्या अनेक काळापासून ७५ किलोमीटर प्रतितास वेगमर्यादा लागू होती. विशेषतः पावसाळ्यात या पट्ट्यावर सातत्याने देखरेख ठेवणे आवश्यक असे.

# एमपीएससी राज्यसेवेचा निकाल जाहीर

## सोलापूरचा विजय लामकाने राज्यात पहिला, तर आरती जाधव महिलांमध्ये पहिली

**नागपूर** : महाराष्ट्र लोकसेवा अयोगातर्फे (एमपीएससी) २७ ते २९ मे, २०२५ या कालावधीत घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२४ चा अंतिम निकाल ८ एप्रिल, २०२६ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार विविध २० संवर्गातील एकूण ४६१ पदांवर उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे. या परीक्षेमध्ये सोलापूर जिल्हातील विजय नागनाथ लामकाने हे सर्वसाधारण तथा मागासवर्ग उमेदवारांमधून राज्यात प्रथम तर सोलापूर जिल्हातील आरती परमेश्वर जाधव या महिलांमधून राज्यात प्रथम आल्या आहेत. अंतिम निकाल जाहीर न झाल्याने उमेदवारांच्या मुलाखती रखडल्या होत्या.




लोकसत्ताने अनेकदा या विषयाला वाचा फोडली होती.

उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गासाठी शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (सीमांकन गुण) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. प्रस्तुत निकालाद्वारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास, अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्राची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास तसेच शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

वैद्यकीय तपासणीस अनुपस्थित असलेले वैद्यकीय तपासणी पूर्ण न केलेल्या उमेदवारांचा अंतिम निकालात समावेश करण्यात आलेला नाही. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या व अन्य मुदयांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे. प्रस्तुत परीक्षेकरिता मा. उच्च न्यायलय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.१७४६/२०२६प्रकरणी दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या आदेशानुसार संबंधित उमेदवारांचा निकालात समावेश करण्यात आला आहे.

तथापि, प्रशासकीय कारणास्तव सदर उमेदवाराची शिफारस राखून ठेवण्यात आली आहे.

# अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचा दर्यापूर येथे निर्धार; पक्ष बांधणीचा व सामान्यांचे प्रश्न सोडवण्याचा संकल्प!

## दर्यापूर तालुका युवक काँग्रेसची आढावा बैठक मोठा उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे/तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथे अमरावती जिल्हा युवक काँग्रेसची एक अत्यंत महत्त्वाची आणि धोरणात्मक बैठक उत्साहात संपन्न झाली. या बैठकीच्या माध्यमातून जिल्हा युवक काँग्रेसने आगामी काळासाठी आपली संघटनात्मक ताकद वाढवण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली आहेत. दर्यापूर तालुका युवा काँग्रेसचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जिल्हा युवक काँग्रेसच्या या मोहिमेला पाठबळ दिले, ज्यामुळे संपूर्ण परिसरात काँग्रेसमय वातावरण पाहायला मिळाले.

या बैठकीत प्रामुख्याने 'पक्ष बांधणी' हा कळीचा मुद्दा राहिला. अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने 'गाव तिथे शाखा' हे अभियान अधिक गतिमान करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक गावात युवक काँग्रेसचे सक्रिय युनिट तयार करून, त्या माध्यमातून स्थानिक तरुणांना मुख्य प्रवाहात सामील करून घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे जिल्हाभर संघटनेचे जाळे अधिक घट्ट आणि प्रभावी होणार आहे.

जनसामान्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणे ही अमरावती जिल्हा युवक काँग्रेसची नेहमीच ओळख राहिली आहे. याच अनुषंगाने, सामान्य नागरिकांच्या दैनंदिन समस्या, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि स्थानिक पातळीवरील विकासाचे प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा युवक काँग्रेस आता अधिक आक्रमकपणे कार्य करणार आहे. सामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी युवक काँग्रेसचे कार्यकर्ते सदैव तत्पर राहतील, असा ठाम विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा सर्वसमावेशक विचार आणि ध्येयधोरणे प्रत्येक घराघरात पोहोचवण्यासाठी अमरावती जिल्हा युवक काँग्रेस कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले. द्वेषाच्या राजकारणाला छेद देऊन लोकशाही आणि संविधानाचे रक्षण करण्यासाठी काँग्रेसचा विचारच तारणहार ठरणार आहे. कार्यकर्त्यांनी घराघरात जाऊन जनतेशी संवाद साधावा आणि पक्षाची विचारधारा रुजवावी, असा निर्धार जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आला.

या बैठकीस अमरावती लोकसभेचे खासदार बळवंतभाऊ वानखडे आणि युवक काँग्रेसचे




महासचिव इंजि. नितेशभाऊ वानखडे यांची विशेष उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले आणि संघटनेला अधिक बळकट करण्यासाठी दिशादर्शन केले. मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून, आगामी काळात दर्यापूरसह संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेसची लाट निर्माण करण्यासाठी सर्वजण सज्ज झाले आहेत.

यावेळी प्रामुख्याने- खासदार बळवंतभाऊ वानखडे ( अमरावती लोकसभा ) , सुनीलभाऊ गावंडे ( सभापती कृ.उ.बा.स. दर्यापूर ) , कपिलभाऊ ढोके ( उपाध्यक्ष युवक काँग्रेस महाराष्ट्र ) , राहुल येवले ( जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस अमरावती ) , अनिकेत ढेंगळे ( कार्यकारी अध्यक्ष जिल्हा युवक काँग्रेस अमरावती ) , अहमद खा. शहादत खा पठाण ( उपाध्यक्ष न.प. दर्यापूर ) , इंजि. नितेश वानखडे ( महासचिव युवक काँग्रेस महाराष्ट्र ) , रितेश पांडव ( महासचिव युवक काँग्रेस महाराष्ट्र ) , जगदीश कांबे,ऋग्वेद सरोदे ( दर्यापूर विधानसभा अध्यक्ष युवक काँग्रेस ) , सागर देशमुख ( तालुकाध्यक्ष युवक काँग्रेस दर्यापूर ) , चेतन भाऊ गीते, अहमद भाई, भारत भाऊ आठवले, प्रभाकरराव तरळ, रामेश्वर भाऊ चव्हाण, दिलीप भाऊ चव्हाण, हबीब भाई, अजयराव देशमुख, मंदा ताई इंगळे, मंगला ताई तराळ, शिवाजीराव देशमुख, मनोज भाऊ बोरेकर, जावेद भाई, नितीन भाऊ गावंडे, नदीम भाई, सुलतान भाई मिर्झा, सचिन भाऊ धुवे, दत्तू भाऊ वडतकर, सैय्यद जुबेर, चेतन देशमुख, सत्यविजय भाऊ वानखडे, राजेश देशमुख, वैभव मालखेडे, आकाश कराळे, संजयराव कुटासकर, बालू भाऊ गवई, ऋषिकेश शेंगोकार, रोहीत काळे, सचिन मांडोकार, तेजस नितनवरे, जगदीश कांबे, प्रज्ञावंत उमक, मंगेश सावळे, सैय्यद सोहेल, सैय्यद इम्रान, संतोष आठवले, ओम घोरड, विरेंद्र मोहोड, अस्लम मन्सूरी, फारुक पठाण, राज इंगळे, सौरभ देशमुख, रोहित वानखडे, अक्षय देशमुख, अजमत भाई ठेकेदार, आकाश माहुलकर, ओम बायस्कार यांच्यासह युवती काँग्रेस , युवक काँग्रेसचे कार्यकर्ते शहरातील नगरसेवक , नागरिक मोठ्या संख्येने या तालुका युवक काँग्रेस आढावा बैठकीत उपस्थित होते.

---

## जनगणनेचे काम आशा वर्कर ला देण्याच्या विरोधात भिवापूर तहसीलदार व तालुका वैद्यकीय अधिकारी यांना सिटू तर्फे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन CITU नागपूर जिल्हा तर्फे आगामी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमा अंतर्गत हाऊस टू हाऊस सर्वेक्षण व मॅपिंग करता सहाय्य कर्मचारी म्हणून आशा स्वयंसेविका यांची विना मोबदला नेमणूक करण्याच्या विरोधात भिवापूर तालुक्याचे तहसीलदार व तालुका वैद्यकीय अधिकारी यांना सोमनाळा पीएचसी मधील सर्व आशा वर्कर यांच्या उपस्थितीत जिल्हा अध्यक्ष कॉम्रेड राजेंद्र साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनाच्या वेळेस दोन्ही अधिकारी



अनुपस्थित असल्यामुळे खालच्या अधिकाऱ्यांना निवेदन सुपूर्द करण्यात आले. भिवापूरचे 2 एप्रिल 2026 रोजी द्यावी केलेल्या पत्रानुसार आशा स्वयंसेविका यांनी आगामी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत हाऊस टू हाऊस सर्वेक्षण व मॅपिंग करता सहाय्य कर्मचारी म्हणून विना मोबदला काम करावे असे पत्र जारी करण्यात आले. स्वयंसेविका असून त्यांना कामाच्या आधारावर मोबदला प्राप्त होतो. सध्या स्थितीत आशा स्वयंसेविका यांचे वर माता मृत्यू व बालमृत्यू रोखण्याबरोबरच इतर रोगरायची व लसीकरणाची मोठी जिम्मेदारी आहे. वरील काम अल्प मोबदल्यामध्ये त्यांना ऑनलाइन व ऑफलाईन पद्धतीने करावे लागत आहे. त्यांचेवर स्वतःच्या कामाच्या मोठा ताण असून त्याच कामामुळे त्या विविध रोग राहीने ग्रस्त होत चाललेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाव्यतिरिक्त इतर काम करणे शक्य नसून त्यांच्या कामावर व मानधनावर सुद्धा विपरीत परिणाम होण्याची संभावना आहे. त्यामुळे बी एल ओ चे काम करीत असणाऱ्या आशा स्वयंसेविका त्यांना सुद्धा पी एल ओ च्या कामातून वगळून त्या व्यतिरिक्त इतर आशा स्वयंसेविकांना वरील काम देऊन बळजबरी करण्यात येत आहे ती बंद करावी. आशा स्वयंसेविका यांच्या मुख्य कामाव्यतिरिक्त त्या इतर दुसरे कोणतेही काम करणार नाही. अशी माहिती पत्रकामध्ये कॉम्रेड राजेंद्र साठे यांनी दिली.

## विज वितरणाच्या तारांच्या स्पर्शातुन आग

### शिवडीला शेतकर्याचे अडीच हजार बांबु जळुन खाक !

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यातील शिवडी शिवारातील जयकृष्ण खापरे या शेतकर्याचे शेतातील लोंबकळणार्या वीज तारांच्या स्पर्शातुन निर्माण झालेल्या आगीच्या ठिणगीतुन अचानकपणे शेतातील द्राक्षबागेसाठी आणलेले बांबु

आगीच्या भक्ष्यस्थानी पडले यातुन मोठी वित्तहानी झाली आहे स्थानिक नागरीकांच्या सतर्कतेमुळे जिवित हानी टळली निफाड तालुक्यातील शिवडी शिवारातील मध्य रेल्वेलगत असलेल्या खापरे- सांगळे वस्तीवरील जयकृष्ण खापरे यांचे शेतातील घरालगत द्राक्षबागेच्या आधारासाठी आवश्यक असलेले सुमारे अडीच हजारावर बांबु खरेदी करुन ठेवलेले होते.त्यालगत एक ट्रॅक्टर उभा होता शेतातुन गेलेल्या वीज




वाहक तारा ह्या लोंबकळणार्या होत्या स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी वीज वितरण कंपनीला सुचना देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले गेले होते बुधवारी दुपारी जोरदार वारा वाहत असतांना वीजेच्या तारांचे शॉर्टसर्कीट होऊन झालेल्या घर्षणातुन आगिचे लोळ शेतातील बांबुवर पडले अन आग लागली . सांगळे वस्तीवरील नागरिकांनी धुराचे लोळ पाहुन घटनास्थळी धाव घेतली असता आगीने मोठे रुप धारण केले होते त्या ठिकाणी असलेला ट्रॅंक्टर स्थानिकांनी शिताफिने बाजुला घेतला मात्र आगीच्या रौद्ररुपात सर्व बांबु जळुन खाक झाले यात सुमारे एक लाखावर रुपयांची वित्तहानी झाली आहे.आगीने रौद्र रुप धारण केल्यानंतर पाण्याचे टॅंकर मागविण्याचा प्रयत्न केला मात्र नुकत्याच मध्य रेल्वे प्रशासनाने उभ्या केलेल्या लोखंडी कमानींमुळे आग वेळीच आटोक्यात आणणनेसाठी टॅंकर येण्यास अडथळा निर्माण झाला होता.

---

## "जिद्द आणि मेहनतीची कमाल" दाभड येथील वैष्णवी सल्कमोडेची ग्रामसेवक पदी निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी – अरविंद पांचाळ** : अर्धापूर तालुक्यातील दाभड गावातील कन्या वैष्णवी बालाजी सल्कमोडे हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर उल्लेखनीय यश संपादन करत ग्रामसेवक पदावर नियुक्ती मिळवली आहे. तिची घनसांगवी, जिल्हा जालना येथे ग्रामसेवक म्हणून निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.साध्या व गरीब कुटुंबातून येत असतानाही वैष्णवीने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपल्या मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले. तिच्या या यशामुळे केवळ तिच्या कुटुंबाचाच नव्हे, तर संपूर्ण दाभड गावाचा



अभिमान वाढला आहे.वैष्णवी सध्या ऑक्सफर्ड इंग्लिश मीडियम स्कूल दाभड येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असून, विद्यार्थ्यांसाठी ती एक आदर्श ठरली आहे. तिच्या या यशामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.तिच्या पुढील उज्ज्वल भविष्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## नांदूर मध्यमेश्वर–देवगाव येथे १० एप्रिलला महसूल समाधान शिबिर ; एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवांचा लाभ

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : शासन आपल्या दारी या संकल्पनेअंतर्गत नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यासाठी निफाड तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत, महसूल व इतर विभागांशी संबंधित प्रलंबित कामे जलदगतीने निकाली काढण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

हे शिबिर शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ रोजी नांदूर मध्यमेश्वर तसेच देवगाव येथे आयोजित करण्यात येणार असून सकाळी १० वाजेपासून शिबिरास प्रारंभ होणार आहे. या शिबिरात महसूल विभागाशी संबंधित ७/१२ उतारे, फेरफार नोंदी, विविध प्रकारचे दाखले यांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच उत्पन्न, रहिवासी, जातीचे दाखले व नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रांसाठी अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

याशिवाय संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, रेशन कार्डाशी संबंधित कामे, आरोग्य तपासणी, आयुष्मान भारत योजनेबाबत मार्गदर्शन तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांना विविध सेवांसाठी वेगवेगळ्या कार्यालयांची धावपळ करावी लागणार नाही.

शिबिरास उपस्थित राहताना नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक तसेच आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे. अनेक सेवांसाठी प्रत्यक्ष अर्ज स्वीकारले जाणार असल्याने संबंधित तलाठी किंवा ग्रामसेवकांशी पूर्व संपर्क साधल्यास प्रक्रिया अधिक सुलभ होईल, असेही सांगण्यात आले आहे.

या शिबिराच्या प्रसंगी प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, नायब तहसीलदार राहुल मुळीक, बाबासाहेब खेडकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

नांदूर मध्यमेश्वर व देवगाव परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा व आपल्या प्रलंबित कामांचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आहेर बोरगावच्या शेख जुनेद यांची मुंबई लोहमार्ग पोलीस दलात निवड



**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** :आहेर बोरगाव येथील शेख जुनेद शेख जाफर यांची मुंबई लोहमार्ग पोलीस पदावर निवड झाल्याबद्दल त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. हा सत्कार श्री डॉ. आप्पासाहेब लहाने यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी प्रकाश अण्णा लहाने, भागवत लहाने, मुकुंद लहाने, शिवाजी काळे, शेख माजिद, शेख साजिद, शेख समीर, ज्ञानेश्वर लहाने, लक्ष्मण मोगरे आणि मिलिंद साळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

---

## श्री शिवाजी विद्यालयात नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा भव्य सत्कार सोहळा संपन्न !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ प्रतिनिधी/आकोट** : स्थानिक श्री शिवाजी विद्यालय आकोट येथे दि.७/०४/२०२६ मंगळवार ला शहराच्या विकासाची धुरा सांभाळणाऱ्या नगरपरिषद आकोट चे नवनिर्वाचित नगराध्यक्ष, उपाध्यक्ष,सर्व सभापती ,नवनियुक्त मुख्याधिकारी आणि सर्व नगरसेवकांचा जाहीर सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार



पडला. विद्यालयात आयोजित या कार्यक्रमात शिक्षण आणि समाजकारण यांचा सुरेख संगम पाहायला मिळाला.

**सत्कार समारंभ** : कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव मेतकर होते. त्याचप्रमाणे सुरेश दादा खोटरे कार्यकारणी सद्स्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती , संस्थेचे आजीवन सभासद, मुख्याध्यापक,उप मुख्याध्यापक,पर्यवेक्षक,शाळा निरीक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. त्यासोबतच नगरपरिषद आकोट चे उपाध्यक्ष, सर्व सभापती,नवनियुक्त मुख्याधिकारी आणि प्रभागातील सर्व नवनिर्वाचित नगर सेवकांचाही विद्यालयाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# प्रा .सिद्धार्थ पानवले यांचे विविध विषयातील तीन संशोधन निबंध प्रकाशित..

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)** : लाल बहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय, परतूर येथील प्राध्यापक सिद्धार्थ पानवाले यांनी कायदा, इंग्रजी आणि इतिहास या विविध विषयांमध्ये उल्लेखनीय संशोधन करत तीन महत्त्वपूर्ण शोध निबंध प्रकाशित केले आहेत.



कायदा विषयातील "Constitutionalism: Its Interpretation and the Rule of Law" या विषयातुन संविधानवाद आणि 'Rule of Law' यांचे विश्लेषण केले आहे.

इंग्रजी विषयात "Catharsis as a Medical Metaphor: A Critical Analysis" या निबंधाद्वारे साहित्यिक 'कॅथार्सिस' संकल्पनेचा वैद्यकीय रूपक म्हणून चिकित्सक अभ्यास सादर केला आहे.

इतिहास विषयात "Historiographical Analysis of Mahavansa and Ashokavadana" या निबंधातून महावन्स आणि अशोकावदान या सम्राट अशोका वरील प्राचीन ग्रंथांचे इतिहासलेखनाच्या दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे.

या यशाबद्दल MSSP मंडळ चे सचिव कपिल आकात, डॉ. कुणाल आकात, मा.नगरसेवक विजयजी राखे,माजी नगराध्य क्ष विनायकराव काळे, प्राचार्य डॉ. भारत खंदारे,निवृत्त प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, डॉ. संजय पुरी,एकनाथ कदम,अशोक खरात डॉ.उनवणे, डॉ. कामठे, प्रा. खय्युम शेख,किरण मगर सिद्धार्थ इंगळे या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रा. सिद्धार्थ यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेख रूक्सार युनुसची पोलिस दलात भरारी

## सामाजिक चळवळीतील सहकाऱ्यांकडून गौरव :- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी):** महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेत बीड तालुक्यातील चऱ्हाटा येथील सामाजिक चळवळीतील सहकारी शेख युनुस चऱ्हाटाकर यांची मुलगी शेख रूक्सार युनुस हिची पुणे शहर पोलिस दलात निवड झाल्याबद्दल बीड येथील शासकीय विश्रामगृहात बुधवारी (दि.०८) रोजी सामाजिक चळवळीतील सहकाऱ्यांच्या वतीने सहकुटुंब तिचा व कुटुंबियांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. बीड शहराजवळील चऱ्हाटा गावातील सर्वसामान्य कुटुंबातील रूक्सार हिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले. शारीरिक तंदुरुस्ती,



नियमित अभ्यास तसेच लेखी परीक्षेची काटेकोर तयारी करत तिने पोलीस भरती प्रक्रियेतील सर्व टप्प्यांवर यशस्वीपणे मात केली. तिच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या वेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "शेख रूक्सार हिने शारीरिक चाचण्या, लेखी परीक्षा आणि मुलाखती अशा सर्व टप्प्यांवर यशस्वी वाटचाल करून ग्रामीण भागातील मुलींसाठी एक आदर्श निर्माण केला आहे. जिद्द, सातत्य आणि मेहनतीच्या बळावर कोणते ही ध्येय गाठता येते, हे तिच्या यशातून स्पष्ट झाले आहे. तिच्या या यशाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे."तसेच, सामाजिक चळवळीतील सहकाऱ्याची लेक असल्याने ती सर्वसामान्यांच्या समस्या जाणून घेत कर्तव्य पार पाडेल, अशी अपेक्षा ही त्यांनी व्यक्त केली. सत्कारमूर्ती शेख रूक्सार युनुस हिने आपल्या यशाचे श्रेय कुटुंबातील सदस्यांना देत त्यांच्या मोलाच्या साथीमुळे मला हे यश मिळाल्याचे सांगितले. भविष्यात सामाजिक चळवळीतील सहकाऱ्यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही तिने या वेळी बोलताना दिली. या वेळी शेख युनुस यांनी मुलीच्या सत्काराचे आयोजन केल्या बद्दल सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमात बाळासाहेब मोरे पाटील( प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती-भिमशक्ती विचारमंच, महाराष्ट्र राज्य ), माजी सैनिक अशोक येडे( जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड ), रामधन जमाले( जिल्हाध्यक्ष, इंटक ), प्राचार्य डी.जी.तांदळे( अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य किसानसभा, बीड जिल्हा ), नितीन सोनावणे (जिल्हाध्यक्ष, ऑल इंडिया पॅंथर सेना), किष्किंधा पांचाळ( अध्यक्ष, विश्व कल्याण महिला सेवा भावी संस्था, बीड ), आम्रपाली साबळे( मराठवाडा उपाध्यक्ष, अन्याय -अत्याचार-भ्रष्टाचार विरोधी समिती, महाराष्ट्र राज्य ), सिताबाई भोसले( महिला जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ) यांच्या सह मान्यवरांनी रूक्सारच्या यशाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. या वेळी माहिती अधिकार कार्यकर्ते शेख मुबीन, पांडुरंग हराळे, धनंजय सानप, विनेश उबाळे( सरपंच, चऱ्हाटा), रफीक पठाण( जिल्हा उपाध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड ), हनुमान घोडके, सूर्यकांत ठोकळ( जिल्हा सल्लागार, ऑल इंडिया पॅंथर सेना, बीड ), राजू वाघमारे सह आदी सामाजिक कार्यकर्ते, मित्र परिवार तसेच शेख रूक्सार युनुस हिचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## कलयुगातही जिवंत संस्कार—सुनेने लिहिली मायेची कहाणी

# नात्यांची खरी श्रीमंती दाखवणारी घटना; साडेतीन महिने अहोरात्र सेवा करत सुनेने दिला संस्कारांचा जिवंत धडा

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम आजच्या धावपळीच्या, स्वार्थप्रधान आणि 'मी आणि माझे' या संकुचित विचारसरणीच्या युगात नात्यांमधील जिव्हाळा हरवत चालला आहे. सासू-सुनेचे नाते अनेकदा तणाव, वाद आणि दुराव्याचे प्रतीक बनलेले पाहायला मिळते. वृद्ध आई-वडिलांना ओझं समजून त्यांना दूर लोटण्याच्या घटना वाढत असताना, वाशिममधील कांचन कपाले यांनी आपल्या कृतीतून समाजासमोर एक हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे.

८५ वर्षीय कै. शांताबाई रमाकांत कपाले या किडनी, लिव्हर आणि हृदयविकाराने गंभीर आजारी होऊन पूर्णतः अंथरुणाला खिळल्या होत्या. केवळ ३५ किलो वजन, मल्टी ऑर्गन फेल्युअरकडे झुकलेली अवस्था... अशा कठीण परिस्थितीत डॉक्टरांनीही "आता औषधांपेक्षा सेवा महत्त्वाची" असे स्पष्ट सांगितले होते.

अशा वेळी कांचन कपाले यांनी सासूची सेवा ही केवळ जबाबदारी म्हणून नव्हे, तर आईप्रमाणे केली. साडेतीन महिने त्यांनी दिवस-रात्र एक करत, अक्षरशः स्वतःचा विसर पडेल अशा पद्धतीने सेवा केली. डायपर बदलणे, स्वच्छता राखणे, अन्न लिक्विड करून प्रेमाने भरवणे—या सगळ्या



गोष्टी त्यांनी कोणतीही तक्रार न करता केल्या.विशेष म्हणजे, या संपूर्ण काळात त्यांनी पती धनंजय कपाले यांच्यासमोर कधीही थकवा व्यक्त केला नाही. चेहऱ्यावर हसू आणि मनात अपार माया ठेवून त्यांनी सासूच्या प्रत्येक क्षणाला सन्मान दिला. ही सेवा केवळ शरीराची नव्हती, तर ती नात्यांमधील माणुसकीची, प्रेमाची आणि संस्कारांची जाणीव करून देणारी होती. जिथे अनेक ठिकाणी सासूला 'ओझं' मानलं जातं, तिथे कांचन यांनी सासूमध्ये आईचं रूप पाहिलं आणि त्या नात्याला एक नवी उंची दिली.या प्रेमाचा प्रभाव पुढील पिढीवरही उमटला. नातू तन्मय आजीचा लाडका

> **"आजच्या काळात छोट्या-छोट्या गोष्टींवरून नाती तुटताना दिसतात. पण जर आपण एकमेकांकडे 'आपलं माणूस' म्हणून पाहिलं, तर सासू-सुनेचं नातंही आई-मुलीइतकं सुंदर होऊ शकतं. सेवा ही ओझं नसून प्रेमाची भाषा आहे—ती जपली, तर घरचं वातावरण आपोआप स्वर्गासारखं होतं."**
>
> **— कांचन कपाले**

'बाबू' बनला, तर नात मानसी आजीच्या मायेची सावली बनली. आजीने आपल्या हातातील सोन्याची अंगठी मानसीला देताना दिलेला आशीर्वाद हा केवळ दागिना नव्हता, तर त्या नात्यांच्या अमूल्य संपत्तीची साक्ष होती.आजच्या चंगळवादी समाजात, जिथे नाती पैशांपुढे हरवत आहेत, तिथे कांचन कपाले यांनी दाखवून दिलं की—नात्यांची खरी श्रीमंती ही प्रेम, सेवा आणि त्यागात असते."सून असावी तर कांचनसारखी, आणि नातवंडे असावीत तर तन्मय-मानसीसारखी," असे उद्गार काढावेसे वाटतील अशी ही प्रेरणादायी घटना आहे.

ही कथा केवळ एका कुटुंबाची नाही, तर संपूर्ण समाजाला आरसा दाखवणारी आहे—ज्यात नात्यांची खरी किंमत काय असते, हे स्पष्टपणे दिसून येते.

# सिने-नाट्य सांस्कृतिक गुढी चा पहिलावहिला कलावंत मेळावा दिमाखात संपन्न..!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज) :** नुकताच सिने-नाट्य सांस्कृतिक गुढी चा पहिलावहिला कलावंत मेळावा राशी स्टुडिओ, माने वखार, करीरोड, मुंबई 12. या ठिकाणी प्रसिद्ध सिने-नाट्य कलावंत, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, निर्माते यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. हा मेळावा एकत्रितरीत्या साजरा करण्यामागे उद्देश एवढाच होता कीं तळागाळातील सर्व कलावंतांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा शिवाय एकमेकांच्या भेटीगाठी होऊन कामासंदर्भात चर्चा होईल आणि प्रत्येक कलावंताला त्याच्या हाताला काम मिळेल. या मेळाव्याचे आयोजन सर्वश्री दिलीप दळवी, डॉ.किशोर खुशाले, अनिल सुतार, महेश्वर तेटांबे, शीतल माने-शेळके आणि सिद्धी कामथ यांनी केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन महाराष्ट्र बाजारपेठ चे संस्थापक,अध्यक्ष डॉ.कौतिक दांडगे, प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक सदानंद राणे,







प्रसिद्ध हास्य अभिनेते कांचन पगारे आदी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्यात अनेक कलावंतांनी सहभाग घेऊन आपली कला सादर केली त्यात प्रामुख्याने लावणी नृत्य, एकपात्री अभिनय, नाट्य प्रवेश, कराओके गायन आणि खास करून प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक अनिल सुतार यांनी स्व.शाहीर दादा कोंडके यांच्या गीतांवर केलेलं नृत्य आणि प्रसिद्ध वादक कलावंत डॉ.किशोर खुशाले यांनी काही निवडक वाद्यांची माहिती आपल्या कल्पकतेने मांडून रसिकांची वाहवा मिळवली. प्रसिद्ध अभिनेत्री सिद्धी कामथ यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचं सूत्रसंचालन आपल्या मधाळ आणि रसाळ वाणीने करून रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं. आणि महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी जमलेल्या सर्व कलावंत, अतिथी यांचे आभार मानले. हा पहिलावहिला कलावंत यशस्वी करण्यासाठी सिद्धी कामथ आणि शीतल माने-शेळके यांनी विशेष मेहनत घेतली. त्याचप्रमाणे या मेळाव्यासाठी सर्वश्री.अरविंद घेवडे, प्रमोद मोहिते, आबा पेडणेकर, शंकर पिसाळ, अविनाश राऊत, उदय साटम यांनी सर्वतोपरी सहकार्य केलं.

अशा तऱ्हेने कलावंतांच्या उत्साहात पहिलावहिला कलावंत मेळावा जोशात आणि दिमाखात संपन्न झाला.

---

# नव्या पिढीचा बुलंद आवाज ॲड.शंकर चव्हाण यांची महाराष्ट्राच्या राजकारणात दमदार एन्ट्री

**दैनिक युवक आधार**
**(प्रतिनिधी):** महाराष्ट्राच्या राजकीय पटावर नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे आणि जनतेच्या प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवणारे अधिवक्ता ॲड.शंकर चव्हाण यांनी राजकारणात दमदार एन्ट्री केली आहे. कायदा, समाजसेवा आणि जनहिताच्या कार्यातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे चव्हाण आता राजकारणाच्या माध्यमातून व्यापक पातळीवर काम करण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्यांच्या या प्रवेशामुळे राज्यातील राजकारणात नव्या ऊर्जा आणि नव्या विचारांची भर पडेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयात अधिवक्ता म्हणून कार्यरत असताना ॲड.चव्हाण यांनी अनेक सर्वसामान्य नागरिकांच्या न्यायासाठी लढा दिला आहे. कायद्याचे सखोल ज्ञान आणि सामाजिक जाणीव यांच्या आधारे त्यांनी महिलांवरील अन्याय, युवकांच्या रोजगाराच्या समस्या, शेतकऱ्यांच्या अडचणी तसेच प्रशासनाशी संबंधित विविध मुद्द्यांवर सक्रिय भूमिका घेतली आहे. त्यांच्या या कार्यामुळे ते "जनतेचा वकील" म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत. समाजसेवेच्या क्षेत्रातही त्यांनी प्रभावी कामगिरी केली आहे. 'विश्वनाथ फाउंडेशन' च्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, रोटी बँक, कपडा बँक, गरजू कुटुंबांना मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य आणि युवकांसाठी रोजगार मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांद्वारे त्यांनी समाजाशी घट्ट नाळ जोडली आहे. या शिवाय 'दैनिक शिवजागर' या माध्यमातून त्यांनी जनतेच्या प्रश्नांना आवाज देत सामाजिक व राजकीय विषयांवर निर्भीडपणे मांडणी केली आहे.



ॲड.चव्हाण यांचा प्रवास केवळ व्यावसायिक मर्यादेत न राहता सार्वजनिक जीवनाशी जोडलेला आहे. त्यांनी न्यायव्यवस्थेत जवळपास सहा वर्षे शासकीय सेवेत कार्य करत प्रशासनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. मात्र, अधिक व्यापक पातळीवर समाजासाठी काम करण्याच्या उद्देशाने त्यांनी त्या पदाचा राजीनामा देत पूर्णवेळ जनहिताच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. हा निर्णय त्यांच्या धाडसी आणि समाजाभिमुख नेतृत्वाची साक्ष देणारा मानला जातो. राजकारणात प्रवेश करताना त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, "राजकारण हे सत्तेसाठी नसून, जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी असते."

याच भूमिकेतून त्यांनी सन २०२४ मध्ये बीड जिल्ह्यातील २३३-परळी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. मतदारसंघातील दौरे, गाठीभेटी आणि नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत त्यांनी स्थानिक पातळीवर स्वतःची मजबूत ओळख निर्माण केली. त्यांच्या या प्रयत्नांना नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. याच बरोबर जनहित लोकशाही पार्टी कडून त्यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष(प.) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाने त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्या वर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. राज्यातील संघटना मजबूत करणे, नवीन कार्यकर्त्यांची फळी उभी करणे आणि पक्षाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचवणे ही प्रमुख उद्दिष्टे त्यांच्या समोर आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ते प्रभावी नेतृत्व करतील, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे.ॲड.शंकर चव्हाण यांचा दृष्टिकोन स्पष्ट आणि ठाम आहे. सुरक्षित, समृद्ध, रोजगारयुक्त आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र घडवण्याचा त्यांचा संकल्प आहे. युवकांना रोजगाराच्या संधी, शेतकऱ्यांना योग्य मोबदला, महिलांना सुरक्षित वातावरण आणि प्रत्येक नागरिकाला न्याय मिळावा या साठी ते कटिबद्ध आहेत. विकास हा सर्वसमावेशक असावा आणि समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी, या वर त्यांचा ठाम विश्वास आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या नव्या नेतृत्वाची गरज अधोरेखित होत असताना ॲड.शंकर चव्हाण यांची एन्ट्री ही एक महत्त्वाची घडामोड मानली जात आहे. त्यांच्या कार्यपद्धतीत स्पष्टता, संघर्ष करण्याची तयारी आणि जनतेशी थेट संवाद साधण्याची क्षमता दिसून येते. त्या मुळे ते एक प्रभावी आणि आशादायी नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. एकूणच, नव्या पिढीचा बुलंद आवाज म्हणून ॲड.शंकर चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात घेतलेली ही दमदार एन्ट्री आगामी काळात राज्याच्या राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकणारी ठरू शकते. त्यांच्या नेतृत्वातून परिवर्तनाची नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. "माझा ठाम विश्वास आहे की महाराष्ट्राचा भविष्यकाळ सुरक्षित, समृद्ध आणि संधींनी परिपूर्ण असला पाहिजे. प्रत्येक युवकाला रोजगार, प्रत्येक शेतकऱ्याला सन्मान, प्रत्येक महिलेला सुरक्षितता आणि प्रत्येक नागरिकाला न्याय मिळेल असा महाराष्ट्र घडवणे हेच माझे ध्येय आहे. विकास हा केवळ काही भागापुरता मर्यादित न राहता गावागावात पोहोचला पाहिजे, आणि प्रशासन पारदर्शक व उत्तरदायी असले पाहिजे. जनतेच्या विश्वासाच्या बळावर, न्याय आणि विकास या तत्त्वांवर आधारित एक सक्षम, स्वाभिमानी आणि उज्ज्वल महाराष्ट्र घडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असे ॲड. शंकर चव्हाण यांनी म्हटले आहे.

## राज्यात 'हब आणि स्पोक मॉडेल' द्वारे अवयवदान व प्रत्यारोपण चळवळ अधिक व्यापक करा – मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई :** महाराष्ट्रातील अवयवदान व अवयव प्रत्यारोपण चळवळ गतिमान करण्यासाठी राज्यात 'हब अँड स्पोक मॉडेल' राबवून अमरावती, नाशिक, पुणे, ठाणे, मीरा -भाईदर व मुंबई येथे अवयव प्रत्यारोपण अधिक व्यापक होईल अशी यंत्रणा उभी करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.मंत्रालयात अवयव प्रत्यारोपण उपाययोजना व आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस राज्यातील सर्व आरोग्य उपसंचालक, वैद्यकीय अधिकारी व संबंधित तज्ज्ञ दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले, राज्यात अवयव प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांची संख्या कमी झाली पाहिजे आणि अधिकाधिक रुग्णांना वेळेत अवयवरुपी नवजीवन मिळाले पाहिजे. त्यासाठी शासकीय रुग्णालयांमधील अवयवदान प्रक्रिया अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. विशेषतः ब्रेन-डेड (मेंदू मृत) रुग्णांच्या नातेवाईकांचे प्रभावी समुपदेशन करून अवयवदानासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करण्याची गरज आहे.अवयवदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून ती एका कुटुंबाकडून दुसऱ्या कुटुंबाला मिळणारी नवी आशा आहे. हे पुण्याईचे आणि नवजीवन देण्याचे कार्य असल्याचा दृष्टिकोन समाजात रुजवला गेला पाहिजे, अवयवदान चळवळ अधिक लोकाभिमुख करण्याची गरज असून, दात्यांची संख्या वाढविण्यासाठी राज्यभर जनजागृती, समुपदेशन आणि संस्थात्मक यंत्रणा उभारणे आवश्यक असल्याचे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.राज्यातील सर्व उपसंचालकांनी विभागस्तरावर अवयवदानाबाबत राज्यभर विशेष जनजागृती मोहीम राबवावी. संदर्भित रुग्णालयात अवयवदान समुपदेशन व मार्गदर्शनासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करावा. आवश्यकतेनुसार तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती/प्रशिक्षण करून प्रत्यारोपण सेवेला गती द्यावी. अवयवदान विषयक कार्यशाळा, जनजागृती मेळावा आणि प्रशिक्षण सत्रे नियमित आयोजित करावीत. राज्यातील ब्रेन-डेड प्रकरणांचा दर दोन महिन्यांनी आढावा घ्यावा, असे निर्देशही आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिले.

# कातकरी वाडीचा कायापालट: केवळ एका समाजाचा लाभ नव्हे, तर सुदृढ समाजाची उभारणी!


अनेकांना वाटेल, "पनवेलच्या कातकरी वाडीला जमीन मिळाली किंवा तिथे घरकुले बांधली गेली, तर त्याचा माझ्याशी काय संबंध? मला तर याचा कोणताही थेट लाभ मिळणार नाही." पण मित्रांनो, हा विचार अपूर्ण आहे. जेव्हा आपल्या समाजातील सर्वात शेवटचा घटक सन्मानाने जगू लागतो, तेव्हा त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण राज्यावर आणि पर्यायाने आपल्यावरही होत असतो.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी कातकरी बांधवांच्या जमीन प्रश्नावर दिलेले आदेश, हे केवळ एका समाजाचे कल्याण नसून ते एका प्रगल्भ समाजाच्या निर्मितीचे पाऊल आहे.

ज्यांना लाभ मिळत नाही, त्यांच्यासाठी ही बातमी का महत्त्वाची आहे?

**१. सामाजिक स्थैर्य आणि सुरक्षा**

ज्या समाजाकडे राहण्यासाठी हक्काची जमीन नसते, त्यांना रोजगारासाठी वणवण करावी लागते. जेव्हा कातकरी बांधवांना स्वतःची जमीन आणि घर मिळेल, तेव्हा त्यांच्या आयुष्यात 'स्थैर्य' येईल. स्थिर समाज हा अधिक सुरक्षित असतो. यामुळे स्थलांतरित मजुरांच्या समस्या कमी होऊन स्थानिक गुन्हेगारीत घट होते, ज्याचा फायदा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपल्यालाच होतो.




**२. पर्यावरणाचे संवर्धन**

कातकरी समाज हा निसर्गाचा गाढा अभ्यासक आहे. त्यांना जमिनीचे अधिकार मिळणे म्हणजे जंगलांचा आणि जैवविविधतेचा रक्षक नेमण्यासारखे आहे. पर्यावरणाचा समतोल राखला गेला, तर त्याचे फायदे (शुद्ध हवा, पाऊस) आपल्या सर्वांनाच मिळतात.

**३. प्रशासकीय संवेदनशीलता आणि आपला विश्वास**

मंत्रालयात झालेली ही बैठक आणि जमिनीसाठी तयार केलेली 'विशेष कार्यपद्धती' हे दर्शवते की आपले प्रशासन आता केवळ नियम पाळणारे राहिले नसून ते 'लोकाभिमुख' झाले आहे. आज कातकरी समाजाचा प्रश्न सुटतोय, उद्या अशाच संवेदनशीलतेने आपलेही प्रश्न सुटतील, हा विश्वास सामान्य नागरिकांमध्ये निर्माण होतो.

प्रशासकीय निर्णयांचे मुख्य पैलू: एक नजर

जमीन हक्काची निश्चिती: सखोल चौकशी करून मालकी हक्क प्रदान करणे.

नकाशावर स्थान: अधिकृत सर्वेक्षण करून वाडीला 'आदिवासी वाडी'चा दर्जा देणे.

शून्य वंचितता: एकही बांधव योजनेपासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घेणे.

**आपले कर्तव्य काय?**

एक नागरिक म्हणून आपल्याला कोणताही थेट लाभ मिळत नसला, तरी आपण या निर्णयाचे स्वागत केले पाहिजे. आपल्या परिसरात अशा वाड्या असतील, तर तिथल्या बांधवांना या सरकारी निर्णयाची माहिती देणे, त्यांना कागदपत्रे गोळा करण्यास मदत करणे, हे आपले 'सामाजिक उत्तरदायित्व' आहे.

**निष्कर्ष**

कातकरी वाडीचा हा प्रश्न सुटणे म्हणजे केवळ घरे बांधणे नव्हे, तर मानवी हक्कांची पुनर्स्थापना करणे होय. जेव्हा त्यांच्या अंगणात तुळस आणि दारात हक्काची जमीन असेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपला महाराष्ट्र 'सुजलाम् सुफलाम्' होईल.

**लेखक: विजयकुमार कट्टी (ठाणेस्थित पर्यावरण आणि समाजप्रेमी)**

**विजयकुमार कट्टी यांचा संदेश:** "आपला विकास तेव्हाच पूर्ण होतो, जेव्हा आपल्या सोबतच्या दुर्बल घटकाचाही विकास होतो. चला, या शासकीय उपक्रमाला जनचळवळ बनवूया!"

## जिल्हयांमध्ये 8 ते 14 एप्रिल दरम्यान 'सामाजिक समता सप्ताह' साजरा होणार

**ठाणे :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे संपूर्ण राज्यात 8 एप्रिल ते 14 एप्रिल 2026 या कालावधीत 'सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे आणि महामानवांच्या विचारांचा जागर करणे हा मुख्य उद्देश आहे.

या सात दिवसांत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 8 एप्रिल: सप्ताहाचे उद्घाटन आणि प्रत्येक कुटुंबाला भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रतीचे वाटप केले जाईल, 9 व 10 एप्रिल: शाळा आणि महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर व्याख्याने, निबंध आणि वकृत्व स्पर्धा घेतल्या जातील. तसेच 'चवदार तळे सत्याग्रह' शताब्दी वर्षानिमित्त मानवी हक्कांवर विशेष कार्यक्रम होतील, 11 एप्रिल: महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रम आयोजित केले जातील, 12 एप्रिल: 'संविधान जागर' अंतर्गत संविधानातील मूलभूत अधिकार आणि कर्तव्यांविषयी मार्गदर्शन केले जाईल. तसेच महिलांसाठी विशेष मेळावे आयोजित करून डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या प्रगतीसाठी केलेल्या कामाची माहिती दिली जाईल, 13 एप्रिल: ज्येष्ठ नागरिकांचे मेळावे, आरोग्य विभागाच्या मदतीने रक्तदान शिबिरे आणि विविध वस्त्यांमध्ये स्वच्छता अभियान राबवले जाईल. या दिवशी जिल्हा जात पडताळणी कार्यालयामार्फत ऑनलाईन वैधता प्रमाणपत्रांचे वाटपही करण्यात येईल, 14 एप्रिल: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी त्यांना अभिवादन करून सप्ताहाचा समारोप होईल. यावेळी शेतकऱ्यांसाठी बाबासाहेबांनी केलेल्या कार्यावर विशेष व्याख्याने आयोजित केली जातील.

जिल्हास्तरावर सामाजिक कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त या सर्व कार्यक्रमांची जबाबदारी सांभाळणार असून ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी या सप्ताहातील विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

## सन्मान सोहळ्याचे आयोजन

**ठाणे :** तेजस्वी फाउंडेशन, ठाणे यांच्या वतीने आयोजित "तेजस्वी सन्मान सोहळा २०२६" शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता मराठी ग्रंथ संग्रहालय, पहिला मजला, रेल्वे स्टेशन रोड, गोल्ड सिनेमा समोर, ठाणे (पश्चिम) येथे संपन्न होणार आहे. महाराष्ट्रातील विविध नामवंतांचा यावेळी सन्मान केला जाणार आहे. या सोहळ्याच्या प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध आकाशवाणी संवादिका पूर्णिमा शिंदे उपस्थित राहणार आहेत. यावेळी अभिनेते श्रीप्रकाश सप्रे, कवी बाबुराव शिंदे तसेच तेजस्वी फाउंडेशनच्या संस्थापिका प्रा. प्रज्ञा पंडित यांची उपस्थिती असणार आहे.या सोहळ्यास साहित्यप्रेमी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक मनिष पंडित यांनी केले आहे.

# प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी उपयुक्त ठरणार –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## इक्विनिक्स एमबी ३ डेटा सेंटरचे उद्घाटन

**मुंबई :** विविध शासकीय योजनांच्या ऑनलाईन अंमलबजावणी दरम्यान बँडविड्थची कमतरता ही मोठी अडचण ठरत होती. विशेषतः शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केल्यावर अचानक वाढणाऱ्या इंटरनेट ट्रॅफिकमुळे प्रणाली कोलमडण्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता असायची. अशा परिस्थितीत डेटा सेंटरमधील प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि तत्काळ बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस हस्ते वर्षा निवासस्थानी इक्विनिक्स (Equinix) कंपनीच्या एमबी ३ डेटा सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे तसेच एपीएसी (APAC) चे अध्यक्ष सायरस अडग्रा, इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज पॉल, व्ही.पी. ग्रोथ अँड इमर्जिंग मार्केटचे मॅक्स पॅरी, आयबीएक्सचे वरिष्ठ संचालक गणेश पवार, पब्लिक पॉलिसी अँड गव्हर्नन्सच्या संचालक एलिजाबेथ हर्नांडेझ उपस्थित होते.

**इक्विनिक्स एमबी ३ डेटा सेंटर**

इक्विनिक्स ही जगातील सर्वात मोठी डेटा सेंटर आणि इंटरकनेक्शन सेवा देणारी कंपनी असून, ३६ देशांतील ७७ महानगरांमध्ये २८० डेटा सेंटर्सचे जाळे कंपनीकडे आहे. भारतातील इक्विनिक्सचे पूर्णतः स्वतःच्या मालकीचे आणि नव्याने उभारलेले



एमबी ३ हे पहिले डेटा सेंटर आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३.७ एकर जागेवर उभारणी करण्यात आली असून, एकूण गुंतवणूक सुमारे ७५० दशलक्ष अमेरिकन डॉलर (सुमारे ६,००० कोटी रुपये) इतकी आहे. पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर येथे ४,२०० हून अधिक कॅबिनेट्सची क्षमता उपलब्ध होणार आहे. एमबी ३ डेटा सेंटर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित सेवांसाठी सक्षम आहे. तसेच, हायब्रिड मल्टी-क्लाउड इंटरकनेक्शन सुविधेद्वारे जगभरातील इक्विनिक्सच्या डेटा सेंटर्सशी तसेच ११ हजाराहून अधिक ग्राहकांशी जोडणी शक्य होणार आहे.

ऊर्जा शाश्वततेच्या दृष्टीने यवतमाळ येथे उभारण्यात आलेल्या २६.६ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पातून या डेटा सेंटरसाठी आवश्यक ऊर्जेचा मोठा भाग उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सध्या मुंबईतील इक्विनिक्स डेटा सेंटर्समध्ये वापरल्या जाणाऱ्या उर्जेपैकी सुमारे ६० टक्के ऊर्जा या सौर प्रकल्पातून मिळते.


## जागतिक कोकणी भाषा दिन

आज ९ एप्रिल आजचा दिवस जागतिक कोकणी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. प्रख्यात कोकणी कार्यकर्ते शेनाई गोंबेब यांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. कोकणी भाषेला प्रोत्साहन देणे आणि तिची प्रतिष्ठा वाढवणे, कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार करणे हे मुख्य उद्देश हा दिवस साजरा करण्यामागे आहे. या दिवशी कोकणी भाषेतील लेखकांचा आणि कलाकारांचा गौरव केला जातो. मराठीची धाकटी बहीण म्हणून कोकणी भाषा ओळखली जाते. कोकणी भाषा म्हणजे गोव्याची भाषा असा एक समज आहे कारण कोकणी ही गोव्याची राजभाषा आहे. गोव्याशिवाय महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळातील काही भागात कोकणी भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. कोकणी राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात भाषा म्हणून समाविष्ट झाली आहे. कोकणी ही एकसंध बोलीभाषा नसून तिच्यात एकूण आठ प्रकार गणले जातात. गोव्यात बोलली जाणारी कोकणी भाषा ही त्यापैकीच एक असून तिच्यात ख्रिश्चनांची कोकणी आणि हिंदूंची कोकणी असे दोन प्रकार आहेत. ख्रिश्चनांच्या कोकणीवर पोर्तीगीज भाषेचा प्रभाव आहे. महाराष्ट्रातील कोकण भागात बोलली जाणारी कोकणी ही वेगळी आहे. शिवाय वारली, कोणकोणी, डांगी, चित्पावणी, मालवणी वैगरे अन्य बोलीभाषा कोकणाच्या उपभाषा आहेत. इंडो आर्यन भाषांत कोकणी ही सर्वात दक्षिण टोकाकडील भाषा आहे. तिचे नाते मराठी व गुजरातीशी आहे. कर्नाटक आणि केरळमध्ये बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेत द्रविड भाषेतील अनेक मूळ शब्द आहेत. कोकणी बोली भाषा असणाऱ्या लोकांची संख्या एक कोटीच्या घरात आहे. कोकणी ही मराठीची जवळची भाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा द्यावा का याबाबत मतभिन्नता आहे. अनेकजण कोकणी ही मराठीचीच उपभाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा देऊ नये या मताचे आहेत तर कोकणी भाषेचे अभ्यासक व जाणकार कोकणी ही स्वतंत्र भाषा असल्याचे ठामपणे सांगतात. हा वाद लवकर संपणार नाही कारण दोन्ही भाषा सारख्याच आहेत. अगदी साध्या गोष्टी बघितल्या तरी ते आपल्या लक्षात येईल मराठीतील मला या शब्दाला कोकणीत म्हाकां असे म्हणतात, मराठीत इकडे, इथे तर कोकणीत होतो हांगा. कोकणी आणि मराठी भाषा जवळजवळ सारखीच आहे. कोकणी जर सावकाश बोलली तर कोणत्याही मराठी माणसाला त्याचा अर्थ सहज समजेल. कोकणी भाषा ही जगातील सर्वात गोड भाषेपैकी एक आहे. कोकणी भाषेत बोलणे तसेच कोकणी भाषा ऐकणे ही एक मौजच आहे. कोकणी भाषेसारखा आपलेपणा इतर कोणत्याच भाषेत नाही म्हणूनच कोकणी भाषा सर्वांना आपली भाषा वाटते. कोकणी भाषेला मानाचा ज्ञानपीठ पुरस्कारही मिळाला आहे. कोकणी भाषेतील जेष्ठ साहित्यिक रवींद्र कोळेकर यांना २००८ साली तर दामोदर मावजो यांना २०२१ साली मानाच्या ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार व्हावा हा जागतिक कोकणी भाषा दिनाचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश सफल व्हावा हीच सदिच्छा व्यक्त करून कोकणी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांना जागतिक कोकणी भाषा दिनाच्या मनापासून शुभेच्छा देतो.

**श्याम ठाणेदार**

## शबरी महामंडळाच्या योजनांत महिलांना प्राधान्य द्या – मंत्री डॉ. अशोक वुईके

**मुंबई :** आदिवासी बहुल गडचिरोली, गोंदिया, यवतमाळ आदी जिल्ह्यांत सध्या धान कापणी सुरू असताना धान उत्पादक शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणांनी अधिक जबाबदारीने काम करावे. तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या योजनांमध्ये महिलांच्या बचत गटांना व युवकांना विशेष प्राधान्य देण्याचे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले.



धान नुकसानीबाबत मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आदिवासी विभाग, अन्न व नागरी पुरवठा, महसूल विभाग व इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री डॉ. वुईके यांनी सांगितले की, आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणारी आधारभूत किंमत खरेदी योजना शेतकऱ्यांच्या हिताची असून तिची पारदर्शक अंमलबजावणी केल्यास खासगी व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक टाळता येऊ शकते. यासंदर्भात शासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे स्थानिक स्तरावर काटेकोर पालन करावे.धान उत्पादक शेतकऱ्यांनी किती क्षेत्रावर पेरणी केली आहे, याची अचूक माहिती संबंधित विभागांकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. ई-पीक पेरा नोंदींची माहितीही घ्यावी. तांत्रिक नियोजन करून वेळेत अचूक माहिती संकलित करावी. याशिवाय, धान साठवणुकीसाठी पुरेशा गोडाऊनची उभारणी करून शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुदत कर्ज योजना, महिला सक्षमीकरण योजना आणि स्वयंसहाय्यता बचत गट योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. 'स्टँड अप इंडिया' योजनेअंतर्गत आदिवासी भागांत उद्योग उभारणीस चालना देऊन कृषी-आधारित प्रक्रिया उद्योग तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून मूल्यसाखळी प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यावरही त्यांनी भर दिला.

आदिवासी युवकांसाठी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण आणि राज्य परिवहन महामंडळामार्फत वाहन चालक प्रशिक्षण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देत, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटांच्या माध्यमातून अधिकाधिक महिलांना योजनांमध्ये सहभागी करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच धान उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करावे, असे निर्देश मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी यावेळी दिले.